अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार दि. ३ डिसेंबर २०२२ | वर्ष : २१ वे | अंक : ६७ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

# इतक्यात

# बोरामणी विमानतळ कारखाना स्थलांतर — अशक्य

# विमानसेवेसाठी मध्यममार्ग — शक्य

✔ सुराज्य/सोलापूर

**सध्या एका बाजूने ज्या विमानतळाची जोरदार मागणी केली जात आहे; ते नियोजित बोरामणी विमानतळ आगामी काही वर्षात तरी शक्य नाही. दुसऱ्या बाजूने होटगीरोड विमानतळाची तितकीच जोरदार मागणी होत आहे; त्यासाठी सिध्देश्वर साखर कारखान्याची चिमणी पाडणे आवश्यक आहे. चिमणी पडल्यास काही महिने कारखाना बंद होऊ शकतो. शिवाय सहवीज निर्मिती प्रकल्प कायमचा बंद करावा लागेल. ते नको असेल तर कारखान्याचे स्थलांतर करावे लागणार आहे. तेही बोरामणी विमानतळाइतकेच अशक्य आहे. त्यामुळे दोन अशक्य गोष्टींना पकडून आरोप-प्रत्यारोपांद्वारे सोलापूरचे वातावरण गढूळ करण्यापेक्षा मध्यममार्ग काढणे आवश्यक बनले आहे. मध्यममार्ग काढल्यास विमानसेवाही सुरू होईल आणि कारखानाही सुरू राहील, हे शक्य आहे, असा नवा सूर जाणकारांमधून पुढे येत आहे.**

बोरामणी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ मंजूर करण्यात आले आहे, ते लवकरात लवकर कार्यान्वित करण्यासाठी शासन स्तरावरून कार्यवाही करावी, अशी मागणी पुढे आली आहे. मात्र तात्काळ कामकाजाला सुरुवात केली तरीसुध्दा नियोजित विमानतळाचे बांधकाम पूर्ण व्हायला किमान दहा वर्षे लागतील. त्यामुळे बोरामणी विमानतळावरून इतक्यात विमानसेवा अशक्य आहे. होटगीरोड विमानतळावरून नियमित विमानसेवा सुरू करण्यासाठी चिमणी पाडून काही कालावधीकरता सिध्देश्वर साखर कारखाना बंद करणेसुध्दा अशक्य आहे. या पार्श्वभूमीवर एका बाजूला बोरामणी विमानतळाचे काम सुरू करून दुसऱ्या बाजूला कारखाना आणि विमानतळ यातून मध्यम मार्ग काढून होटगीरोड विमानतळावरूनच विमानसेवा सुरू करणे शक्य असल्याचे जाणकारांचे मत आता पुढे आले आहे.

### पेटवापेटवी नको; मिटवामिटवी हवी

चिमणी विरोधक आणि समर्थक या दोघांनाही सोलापूरचा विकास हवा आहे. पण उत्तम पध्दतीचा मध्यम मार्ग काढण्याची दोघांचीही मानसिकता नाही. अशावेळी विमानसेवा आणि सोलापूरचा विकास हे मुद्दे बाजूला पडत असून यामध्ये राजकारणाची घुसखोरी होत आहे. त्यामुळे प्रश्न सोडवण्याऐवजी अधिक गुंतागुंतीचा करणाऱ्यांनी डोकी वर काढली आहेत. त्यामुळे प्रश्नाची पेटवापेटवी करणे नको तर मिटवामिटवी करणे हवे आहे, अशी अपेक्षा आता सोलापूरकर व्यक्त करत आहेत.

### पालकमंत्री म्हणतात तसे...

काही दिवसांपूर्वी पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील सोलापूर दौऱ्यावर आले होते. त्यावेळी होटगीरोड विमानतळाचा मुद्दा त्यांच्यासमोर काढण्यात आला होता. सध्या ज्या बाजूने विमान उतरते; त्याच बाजूने उड्डाण केल्यास होटगीरोड विमानतळावरून नियमित विमानसेवा शक्य असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले होते. तसा प्रयोग करून आहे त्याच विमानतळावरून नियमित विमानसेवा सुरू करता येईल, असाही मतप्रवाह आता जोर धरू लागला आहे.






### गरज विश्वासू मध्यस्थीची

सोलापूर विकास मंच होटगीरोड विमानतळासाठी आग्रही आहे. त्यावरून ते हटायला तयार नाहीत. दुसरीकडे कारखाना आणि कारखान्याचे सभासद व शेतकरीही चिमणीच्या समर्थनावर ठाम आहेत. सध्या दोन्ही बाजूने ताणाताणी सुरू आहे. अशावेळी ही समस्या सोडवण्यासाठी गरज आहे ती विश्वासू आणि खंबीर मध्यस्थाची. अशी मध्यस्थी करण्यासाठी कोणी पुढाकार घेतला तर यातून मार्ग निघणे शक्य आहे, असेही मत जाणकारांमधून व्यक्त केले जात आहे.

### छोट्या विमानांचा वापर

यापूर्वी होटगीरोड विमानतळावरून नियमित विमानसेवा सुरू होती. त्यावेळी ज्या पध्दतीने छोट्या प्रवासी विमानांचा वापर करण्यात आला होता; त्याच पध्दतीने आताही छोट्या प्रवासी विमानांचा वापर केल्यास होटगीरोड विमानतळावरून सध्याच्या परिस्थितीतही नियमित विमानसेवा शक्य असल्याचे काही तज्ञांचे म्हणणे आहे. अशी छोटी विमाने सुरू केल्यास विमानसेवा तर सुरू होईलच. शिवाय सध्या सुरू असलेला संघर्षही टाळता येईल, असा सूर पुढे आला आहे.

---

## मालट्रक-रिक्षाच्या धडकेत एक ठार, आठजण जखमी

### दर्ग्याला जाताना शेळगी जवळ झाला अपघात

✔ सुराज्य/सोलापूर

शहरातील शेळगी परिसरातील महामार्गालगत असलेल्या सर्व्हिस रोडवर आलेल्या मालट्रकने समोरून येणाऱ्या रिक्षाला जोरदार धडक दिल्याने रिक्षातील एक युवती गंभीर जखमी होऊन मरण पावली तर इतर सात जण जखमी झाले.हा अपघात शुक्रवारी दुपारी दोनच्या सुमारास झाला.

मिसबा शुकूर मुलाणी (वय-१४,) असे मरण पावलेल्या युवतीचे नाव आहे. तर मुजीर पठाण (वय २४), रुकसाना (वय ५०), जन्नत, मोहम्मद साद (वय ७), हसीना (वय ७), गुड्डो मन (वय ५), नौशाद (वय ३२, सर्व रा. सोलापूर) अशी जखमींची नावे असून



त्यांच्यावर सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. वरील सर्व जखमी व मयत हे सर्वजण शुक्रवारी दुपारी एमएच १३ एएफ २२०९ या क्रमांकाच्या रिक्षातून शेळगी येथील कुमारस्वामी नगर येथून शाहजहूर अली दर्गा येथे दर्शनासाठी जात होते. परमशेट्टी मिल चौक ते पुणे-हैद्राबाद महामार्गालगतच्या सर्व्हिस रोडवरून रिक्षा जात असताना अॅग्रो मिलच्या पाठीमागे समोरून आलेल्या एमएच ४३ बीपी ८%८८ क्रमांकाच्या मालट्रक चालकाने मालट्रक भरधाव चालवून रिक्षाला समोरून जोरदार धडक दिली. हा अपघात इतका भयानक होता की, रिक्षा पूर्णपणे चमेटून गेली असून रिक्षातील सर्व प्रवासी हे रस्त्यावर फेकले गेले.



अपघातानंतर ट्रकचालक ट्रंक जागीच सोडून पळून गेला. तर यावेळी जोडभावी पेठ पोलिसांनी तसेच जमलेल्या नागरिकांनी जखमींना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात हलविले. रुग्णालयात उपचार सुरू असताना मिसबा मुलाणी ही युवती मरण पावली. याबाबत सिव्हिल पोलीस चौकीत नोंद करण्यात आली आहे.दरम्यान ही घटना शेळगी व अपघातग्रस्त नातेवाईकांना कळल्यानंतर त्यांच्या नातेवाईकांनी सिव्हिल मध्ये एकच गर्दी केली होती.

---

## संघटनात्मक आढावा घेण्यासाठी बावनकुळे ८ रोजी सोलापुरात

✔ सुराज्य/सोलापूर

आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुका आणि संघटनात्मक आढावा घेण्यासाठी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे ८ डिसेंबर रोजी सोलापुरात येत आहेत, अशी माहिती शहराध्यक्ष विक्रम देशमुख यांनी दिली. प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांचा हा शहर आणि जिल्हा संघटनात्मक दौरा आहे.



यात ते विविध सामाजिक मेळावे, संघटनात्मक बैठका, बूथ सक्षमीकरण, शहर व ग्रामीण कोअर कमिटीची बैठक, सोशल मीडिया बूथ कमिटीची बैठक, नवीन मतदार नोंदणी अभियान, युवा वॉरियर्स शाखा उद्घाटन, धन्यवाद मोदीजी अभियानाचा आढावा घेणार आहेत.

सध्या जिल्ह्यात ग्रामपंचायत निवडणुका सुरू आहेत, त्याविषयीही बावनकुळे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. तसेच भाजपने राज्यातील १७ लोकसभा मतदारसंघांमध्ये प्रवास योजना आयोजित केली आहे. यात ६ केंद्रीय मंत्र्यांची नियुक्ती केली असून त्यांच्याकडे या १७ मतदारसंघाची जबाबदारी सोपवली आहे. सोलापूरची जबाबदारी केंद्रीय पंचायत राज मंत्री कपिल पाटील यांच्याकडे दिली आहे. त्याबद्दल बावनकुळे सविस्तर माहिती नेते, पदाधिकाऱ्यांना देणार आहेत.

---

## केडगाव येथे तरुणाला दुजाकीला बांधून फरपटत नेले; तिघांवर गुन्हा

✔ सुराज्य/सोलापूर

पूर्वीचे भांडण तसेच पैशाच्या वादातून एका तरुणाला दुचाकीला दोरीने बांधून फरफटत नेऊन चाकूने मारहाण करीत खुनाचा प्रयत्न केल्याची घटना केडगाव (ता.करमाळा) येथे गुरुवारी दुपारच्या सुमारास घडली.या प्रकरणात करमाळ्याच्या पोलिसांनी रेवणनाथ अंकुश मारकड (रा.चिखलठाण ता.करमाळा) याच्यासह तिघा विरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

अभिजित दासू करे (वय २० रा.कोंडेज ता.करमाळा) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. अभिजित करे आणि आरोपी मारकड यांच्यात व्यवसायातील पैशाच्या वाद तसेच पूर्वीचे भांडण होते. काल दुपारी १२ वाजेच्या सुमारास मारकड याने अभिजीतला केडगाव येथील कॅम्प रस्त्यावर बोलवले होते.

त्याप्रमाणे अभिजित घटना स्थळी आला होता. तेंव्हा मारकड याच्यासह तिघांनी याला लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली. त्यानंतर त्याला दुचाकीला दोरीने बांधून फरपटत उसाच्या शेतात नेले. आणि त्याला चाकूने वार करून गंभीर जखमी करून पसार झाले. अशी नोंद करमाळा पोलिसात झाली. सहाय्यक निरीक्षक जगताप पुढील तपास करीत आहेत

---

## वकिलाचा सल्ला घेऊन खुलास देणार : काडादी

✔ सुराज्य/सोलापूर

सार्वजनिक ठिकाणी बंदूक काढून धमकवल्या प्रकरणात पोलीस प्रशासनाने नोटीस धर्मराज काडादी यांना बजावत परवाना रद्द करण्याचा इशारा दिला या प्रकरणी काडादी यांना विचारणा केली असता दहा दिवसाची मुदत आहे. वकिलाचा सल्ला घेऊन खुलासा केला जाईल असे काडादी यांनी सांगितले



होटगी रोड वरून विमान सेवा चालू करण्यासाठी सोलापूर विकास मंचे आंदोलन चालू आहे. आंदोलनाच्या माध्यमातून आरोप प्रत्यारोप केले जात आहेत. यावरून कारखान्याचे माजी चेअरमन धर्मराज काडादी यांनी उपोषण स्थळी जाऊन उपोषणकर्ते केतन शहा यांना बंदूक दाखवत धमकी दिली होती. याचा व्हिडिओ सोशल मिडीयावर व्हायरल झाल्यानंतर सोलापूर शहरातील वातावरण तापले आहे. याप्रकरणी अद्याप तक्रार दाखल नाही मात्र पोलीस प्रशासनाच्या वतीने सार्वजनिक ठिकाणी बंदूक दाखवत धमकवल्या प्रकरणी नोटीस देत बंदूकीचा परवाना का रद्द करू नये असा इशारा देत दहा दिवसाची मुदत दिली आहे .या प्रकरणी काडादी यांना विचारणा केली असता आपल्या वकिलाशी चर्चा करून खुलासा केला जाणार असल्याचे सांगितले.

---



## ब्राव्हो आयपीएलमधून निवृत्त

✔ **मुंबई** : महेंद्रसिंग धोनीच्या नेतृत्वाखालील फ्रँचायझी चेन्नई सुपरकिंग्जनं आयपीएल २०२३ च्या मिनी ऑक्शनपूर्वी ड्वेन ब्राव्होला रिलीज केलं होतं. त्यानंतर ब्राव्होनं मिनी ऑक्शनसाठी आपलं नाव दिलं नाही. आता त्यानं आयपीएलमधून निवृत्ती जाहीर केलीय. मिळालेल्या माहितीनुसार, चेन्नईचा संघानं ब्राव्होच्या खांद्यावर गोलंदाजी प्रशिक्षकाची जबाबदारी सोपवली आहे.

---

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




छान केलसं! आता या जुन्या गोष्टी रद्दीला दे!

कल्याण
129-25-690

मेन बाजार
167-45-168

---

## आधार कार्ड अद्ययावत करा अन्यथा लाभ मिळणार नाही

### निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांचे आवाहन

✔ सुराज्य/सोलापूर

**केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचे लाभ मिळविण्यासाठी आधार कार्ड अद्ययावत असणे आवश्यक आहे. आधार कार्ड अद्ययावत नसेल तर शासनाचे मिळत असलेले लाभ रद्द होतील तसेच भविष्यात कोणतेही लाभ मिळणार नाहीत. ज्या नागरिकांना आधार कार्ड काढून १० वर्षे पूर्ण झाली आहेत, अशा नागरिकांनी आधार कार्ड अद्ययावत करण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी केले आहे.**

गेल्या काही वर्षापासून ओळखीचा पुरावा म्हणून आधार कार्डाला महत्त्व प्राप्त झाले आहे. त्याअनुषंगाने सर्व नागरिकांना आधार कार्ड नोंदणी करणे तसेच ज्या नागरिकांनी यापूर्वी आधार कार्ड काढलेले आहे व त्याला १० वर्षे पूर्ण झाली असतील अशा आधारकार्डधारक नागरिकांनी आपले आधार कार्ड अद्ययावत करणे आवश्यक आहे. आधार कार्ड योजना सुरू झाली तेव्हा आधार कार्ड काढताना ज्यांनी कोणतीही कागदपत्रे दिली नाहीत, त्यांना आता आधारमध्ये असलेले आपले नाव, पत्ता, जन्मतारीख, वय, लिंग, मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी आदी अद्ययावत करावे लागेल. तसेच डोळयांची बुबुळे, बोटांचे ठसे, चेहऱ्याचे सुधारित छायाचित्र द्यावे लागणार आहे.

आधार कार्ड काढल्यानंतर दर ५ ते १० वर्षांनी आधार अद्ययावत करावे लागते. विशेषतः घराचा पत्ता बदललेला असेल तर किंवा लहान मुलांचे आधार कार्ड काढल्यानंतर त्यांना पाच वर्षांनी अपडेट करणे आवश्यक आहे. बोटांचे ठसे, चेहऱ्याचे छायाचित्र, बदललेला मोबाईल क्रमांक आदींमध्ये बदल करता येतो. पहिल्यांदा आधार कार्ड काढत असाल तर संबंधित केंद्राकडे आवश्यक कागदपत्रे द्यावी लागतात. मुलाचे आधार कार्ड काढायचे असेल तर वडिलांचे आधार कार्ड, रहिवासी दाखला, शाळेचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. जन्म नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक आहे. भारतीय विशिष्ट




ओळख प्राधिकरणाने मुलांच्या आधार कार्डाबाबत मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत.

प्राधिकरणाने जारी केलेल्या नवीन मार्गदर्शक तत्त्वांनुसार ५ ते १५ वर्षे वयोगटातील मुलांच्या आधार डेटामध्ये बायोमेट्रीक तपशील अपडेट करणे बंधनकारक आहे आणि तसे करण्याची प्रक्रिया निःशुल्क आहे. यासाठी जन्म प्रमाणपत्र, गुणपत्रिका, ओळखीचा पुरावा, मतदार ओळखपत्र, पॅन कार्ड, वाहन चालक परवाना, पासपोर्ट यापैकी कोणतेही एक वैध ओळखपत्र आवश्यक आहे.

शहर व जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी अद्याप आधार कार्ड काढले नसतील तर नजीकच्या आधार केंद्रावर जाऊन आपले आधार कार्ड काढून घ्यावे. तसेच विद्यमान आधार कार्डधारकांनी आपले आधार अद्ययावत करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नेपाळचा सत्तासंघर्ष...

भारताच्या शेजारी असलेला आणि आपल्या सदैव मैत्री ठेवलेल्या पण आता आपल्यालाच पाण्यात पाहात असलेल्या नेपाळ या देशातील सत्ता संघर्ष एका वेगळ्या वळणावर येऊन ठेपले आहे.नेपाळी संसदेच्या-म्हणजे काठमांडूतील 'प्रतिनिधी सभे'च्या २७५ पैकी १६५ मतदारसंघांत झालेल्या निवडणुकीचा निकाल जरी विद्यमान पंतप्रधान शेरबहादूर देऊबा यांच्या 'नेपाली काँग्रेस' पक्षाला सर्वाधिक जागा देणारा असला तरी तो अर्धामुर्धाच म्हणावा लागेल. एकतर २७५ पैकी उर्वरित ११० जागा 'प्रमाणशीर प्रतिनिधित्व' पद्धतीने भरल्या जाणार आहेत आणि त्यांचे भवितव्य अद्याप ठरायचे आहे. दुसरे म्हणजे, देऊबा यांचा 'नेपाली काँग्रेस' हा पक्ष ५३ जागा जिंकून त्यातल्या त्यात मोठा ठरला असला, तरी 'कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाल' (सीपीएन) हेच नाव धारण करणाऱ्या पक्षाचे यंदा एकमेकांविरोधात उतरलेले दोन गट - माजी अध्यक्ष पुष्पकमल दहाल ऊर्फ 'प्रचंड' यांचा 'युनायटेड मार्क्सिस्ट - लेनिनिस्ट' (यूएमएल) आणि माजी पंतप्रधान खड्गप्रसाद शर्मा ओली यांचा 'माओइस्ट सेंटर'- हे एकत्र आल्यास त्यांची संख्या ६० भरते. यापैकी जास्त म्हणजे ४३ जागा ओली यांच्या पक्षाला आहेत आणि 'एकत्र सरकार स्थापन करू' असे सूतोवाच करून प्रचंड यांना आपल्या बाजूने वळवण्याच्या हालचालींदेखील सुरू केल्या आहेत. प्रचंड हे सध्या देऊबासमर्थक सत्ताधारी आघाडीत आहेत, तर ओली विरोधकांच्या आघाडीचे प्रमुख. चीनच्या मध्यस्थीने प्रचंड आणि ओली यांचे गट एकत्र आणण्याचा प्रयत्न २०१७ झाला होता, पण साडेतीन वर्षांतच या एकीची पुन्हा बेकी झाली आणि प्रचंड गेले देऊबांकडे. ते आता पुन्हा आपल्याकडे यावेत अशी आशा ओलींना वाटण्याची कारणे दोन. पैकी पहिले 'सत्ताकांक्षा' इतके साधे! पण दुसरे कारण म्हणजे, देऊबा यांच्याबद्दल त्यांच्या 'नेपाली काँग्रेस'मधील कुरबुरी आता चांगलेच डोके वर काढू लागल्या आहेत. वास्तविक, नेपाळमधील नेतृत्वाबद्दलच्या कुरबुरी तिन्ही पक्षांमध्ये असू शकतात, असे मानण्यास जागा आहे. विविध पक्षांचे मिळून ६० विद्यमान नेपाळी खासदार यंदाची निवडणूक



हरले आहेत. हे सारे आपापल्या मतदारसंघांतील ज्येष्ठ नेते होते. २००८ मध्ये नेपाळी लोकशाही सुरू झाली, तेव्हापासून या ज्येष्ठांनी जम बसवला होता. ती पकड आता सुटते आहे. याचे कारण मतदारांमधली अस्वस्थता. ती आता तरुण प्रतिनिधींना वाव देते आहे. यामुळेच अमेरिकेत कुठलेसे उपाहारगृह चालवून मग नेपाळी चित्रवाणीवर कार्यक्रम-सादरकर्ता म्हणून घरोघरी पोहोचलेल्या रवि लामिछाने यांच्या 'राष्ट्रीय स्वतंत्र पार्टी' या अगदी नव्या पक्षाला सात जागा मिळू शकल्या. लामिछाने यांना आता 'किंगमेकर' ठरण्याची स्वप्ने पडत आहेत. पण एवढे होऊनही सध्या तरी देऊबा- प्रचंड - ओली या त्रिकोणातच नेपाळी राजकारण फिरत राहणार, हेच दिसून येते. यातही देऊबांवरली नाराजी स्वत:च्या राजकीय लाभासाठी वापरण्यात ओलींना यश मिळेल का, हे महत्त्वाचे.म्हणजे पंतप्रधानपदासाठी खरी रस्सीखेच देऊबा आणि ओली यांच्यातच. पण यावरच, नेपाळसाठी चाललेली भारत आणि चीन यांची रस्सीखेचही अवलंबून आहे. ओली चीनसमर्थक आणि देऊबा भारतसमर्थक, असे शिक्के मारून झाल्यावरही चीनने रेल्वे, रस्ते आदी मोठे प्रकल्प आखून नेपाळमध्ये पाय रोवलेच आहेत. तेव्हा चीन आणि भारतापैकी नेपाळ कोणाकडे, हा प्रश्न भारतासाठी केवळ निवडणुकीपुरता नसून सातत्यपूर्ण, अगदी दररोजच्या राजनैतिक डावपेचांनीच तो सोडवावा लागणार आहे. नेपाळ हे जगातील एकमेव हिंदूराष्ट्र होते परंतु तिथे माओवादी आणि डाव्यांचे प्रस्थ वाढत गेल्यानंतर त्यांच्या दबावाखाली हिंदूराष्ट्र हे गोंदण पुसले गेले. नेपाळची भारताशी चांगली मैत्री होती. प्रलंयकारी भूकंपाच्या वेळी शेजारधर्म म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वप्रथम मदत पाठवली. मात्र, नेपाळची मानसिकता आता बदलत चालली आहे. हा देश चीनच्या प्रभावाखाली येतो आहे. नेपाळमधील डाव्या विचारसरणीच्या नेत्यांमधून सतत भारत विरोधी सूर आळवला जात आहे. सीमेवरील रस्ते बांधणी थांबवण्याचा इशारा मध्यंतरी दिला गेला तर रामदेव बाबा यांच्या चॅनेलवर बंदी आणली गेली. इतकेच काय? मोदींनी नेपाळच्या राजकारणात हस्तक्षेप करू नये, अशी तंबीही दिली जातेय. मोदींच्या हस्तक्षेपामुळे नेपाळमध्ये अस्थिरता निर्माण होत असल्याची ओरडही ही डावेमंडळी करत आहेत. ही सारी भाषा पाहाता नेपाळचा बोलविता धनी चीन असल्याचे स्पष्ट होते. कारण भारत-नेपाळ संबंधात चीनने ठिकरा टाकला आहे. चीन त्या देशात आपला व्यापार वाढवू पहात आहे. ही सारी पार्श्वभूमी पाहाता नेपाळमधील संघर्षातून कोणाचे नेतृत्व उदयास येते ते पहावे लागेल.

---

## न्यायिक जगत

# कनिष्ठ न्यायालये आणि भीती

**टीकेची भीती असल्याने न्यायाधीश आरोपींना जामीन देत नाही, जिल्हा न्यायाधीशांचा योग्य आदर राखला जात नाही, असे सरन्यायाधीशांनी नुकतेच म्हटले. भारतातील कारागृहांत कच्च्या कैद्यांची वाढती संख्या, न्यायालयांत मोठ्या संख्येने तुंबलेले खटले या साऱ्यांचाच या पार्श्वभूमीवर विचार करायला हवा.**

'टीकेच्या भीतीने न्यायाधीश आरोपींना जामीन देत नाहीत, जिल्हा न्यायाधीशांचा योग्य आदर राखला जात नाही मग ते धाडसी निर्णय कसे घेणार?' अशा आशयाचे विधान सरन्यायाधीशांनी नुकतेच एका कार्यक्रमात केल्याचे प्रसिद्ध झाले आहे. त्याच्याच थोडे आधी, मावळत्या सरन्यायाधीशांनी तालुका, जिल्ह्याच्या स्तरा-वरील न्यायदंडाधिकारी आणि सत्रन्यायालयांतील न्यायाधीश जामीन अर्जांचा निपटारा अगदी यांत्रिक पद्धतीने करतात; त्यामुळे उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालयातील कामाचा बोजा वाढतच जातो, या आशयाचे भाष्य केले होते. दोन्ही सरन्यायाधीशांची ही वक्तव्ये भारताच्या एकूणच न्यायप्रणालीची वस्तुनिष्ठ आत्मपरीक्षण करणारी तर आहेतच; पण न्यायप्रणालीपुढे किती खडतर आणि भयावह आव्हाने येत्या काळात उभी आहेत, याचा धोका दर्शविणारीही आहेत. दोन्ही सरन्यायाधीशांनी देशाची न्यायिक व्यवस्था सर्वोच्च स्थानावरून अनुभवली असल्याने आणि अनुभवत असल्याने, आपण साऱ्यांनी त्यांची विधाने फार गांभीर्याने घेणे गरजेचे आहे.

भारतीय न्यायव्यवस्थेसमोरील समस्यांबाबत आणि तिच्या स्वतंत्र बाण्याबाबत जगभरातून बरीच मते-मतांतरे आपण वरचेवर वाचत, ऐकत आलो आहोत; मात्र टीकेच्या भीतीने कनिष्ठ न्यायाधीश आरोपींना जामीन नाकारतात आणि त्यामुळेच देशातील तुरुंगांत कच्च्या कैद्यांची संख्या प्रचंड वाढत चालली आहे, हे वास्तव पहिल्यांदाच इतक्या उच्चपदस्थाने समोर आणून, आपल्या तुरुंगांची अवस्था अधोरेखित केली आहे. वस्तुतः जामीन देणे हा नियम आणि तो नाकारणे हा अपवाद', हे सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती व्ही. आर. कृष्णा अय्यर यांचे फार महत्त्वाचे तार्किक निरीक्षण आहे. गुडीकांती नरसिंहलू आणि इतर विरुद्ध सरकारी अधियोक्ता, आंध्रप्रदेश, उच्च न्यायालय (१९८७) एक एससीसी २४० या प्रकरणात जामीन मंजूर करताना दिलेला आदेश हा जामीन कायद्यातला एक मापदंड मानला जातो. इतका स्वयंस्पष्ट आदेश सर्वोच्च न्यायालयाने देऊनही कनिष्ठ न्यायालये हा मापदंडच झुगारून देत असतील, तर या स्थितीकडे फारच गांभीर्याने बघायची वेळ आली आहे. न्यायदंडाधिकारी किंवा सत्र न्यायाधीशांकडे येणाऱ्या प्रत्येक जामीन अर्जाची स्थिती, कारणमीमांसा आणि जामिनावर मुक्त होण्यालायक परिस्थिती भिन्न असते. सरसकट असे अर्ज न्यायिकदृष्ट्या निर्णयाप्रत येण्यासाठी 'स्ट्रेट जॅकेट फॉर्म्युला' नसतो, हे वास्तव आपण मानले, तरी-ही गुन्हा अगदीच छोटा असो की मोठा, जामीन मंजूर अथवा नामंजूर करतानाचे न्यायालयांकडून बघण्यात येणारे निकष ठरलेलेच असतात. असे असले, तरीदेखील तालुका वा जिल्हास्तरा-वरील दंडाधिकारी वा सत्रन्यायाधीशांनी जामीन अर्ज नाकारण्यामागच्या अनेक कारणांपैकी एक कारण भ्रष्टाचाराचा आरोप किंवा चौकशीचा ससेमिरा हेच असते. मुंबई उच्च न्यायालयात येण्याआधी मी सुमारे अकरा वर्षे एका जिल्हा आणि सत्र न्यायालयात वकिली केली. त्या अर्थाने मी मूलतः 'ट्रायल लॉयर' आहे; त्यामुळे जामीन अर्जांबाबतची विदारक स्थिती फारच जवळून अनुभवली आहे.



'तालुका स्तरा-वरील न्यायदंडाधिकारी किंवा सत्र न्यायालयातील न्यायाधीश, मोठ्या हातांनी ऑर्डर झालेली बरी', अशी भूमिका घेऊन उच्च न्यायालयाकडे जामीन अर्ज करायची परिस्थिती निर्माण करतात. अशी काही अंशी अपवाद वगळता ही सार्वत्रिक स्थिती आहे. ही बाब केवळ जामीन अर्जापुरतीच सीमित राहत नाही, तर दिवाणी कामकाजांत अंतरिम मनाई हुकुमाचे अर्ज, एकतर्फी स्थगिती आदेशासाठीचे अर्ज या प्रकरणांतही कनिष्ठ न्यायालये त्यांचे अधिकार पुरेशा प्रमाणात वापरायला धजावत नाहीत, असे पुष्कळदा बघण्यात येते.

अशा साऱ्या बाबींचा एकत्रित परिणाम म्हणजे, सर्वोच्च न्यायालय आणि देशभरातल्या उच्च न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या दिवाणी व फौजदारी प्रकरणांची प्रचंड संख्या होय. राष्ट्रीय न्यायिक माहिती स्रोतांनुसार, देशभरातल्या दिवाणी व फौजदारी प्रलंबित प्रकरणांची ३१ डिसेंबर २०२० रोजीची स्थिती अशी होती :

**दिवाणी प्रकरणे फौजदारी प्रकरणे एकूण**

१,०८,७५,८५१-३,१७,८५,६६८ - ४,२६,६१,५१९, ३ ते ५ वर्षांची १६,७५,९५७- ४८,४२,६२४ ६५,१८,५८१,

१० ते २० वर्षांची ५,५६,७२० २२,९०,४४३ २८,४७, १६३, ३० वर्षांहून जुनी ३१,८४२ ६४,५१६ ९६,३५८.

मागील सुमारे दोन वर्षांच्या आणि कोरोनाने लादलेल्या बंदीच्या काळात या आकड्यांमध्ये काही लाखांची भर खचितच पडली असेल. एका परदेशी व्यवस्थापनतज्ज्ञ कंपनीद्वारे, भारताच्या न्यायालयांतील प्रलंबित प्रकरणांच्या निपटाऱ्याबाबत नोंदवलेले निरीक्षण संबंधितांना फारच विचलित करणारे आहे. त्यांच्या तज्ज्ञांचे मते, भारतातील न्यायाधीशांनी खायला, प्यायला न उठता आणि न झोपता दर ताशी १०० प्रकरणे निकाली काढली, तरी निपटारा पूर्ण करायला ३५ वर्षांहून अधिक काळ लागेल.

ही विदारक स्थिती पाहिली की, आ-पली न्यायालयीन पद्धती आमुलाग्र सुधारायला हवी हे सर्वांना पटेल. ब्रिटिश सत्ताधीशांनी त्यांच्या सोयीकरिता म्हणून ठरविलेल्या उन्ह-ाळी महिन्यांच्या सुट्ट्या आणि इतर दीर्घकालीन सुट्ट्यांची चैन आता थांबवणे गरजेचे आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने आणि डिजिटलायझेशनच्यासोबत गतिमान होऊन, ही प्रचंड प्रलंबित प्रकरणांची तार्किक अखेर करायची असेल, तर पुढील उपाययोजना विहित वेळेची बंधने पाळून कराव्या लागतील :

१. न्यायालये दीर्घ सुट्ट्या बंद करून वर्षभर चालवावीत. २. पाच वर्षांहून जुन्या प्रकरणांसाठी विशेष मोहीम राबवून, त्या प्रकरणांचा प्राधान्याने निपटारा करण्यात यावा. ३. संगणकीय मदतीने आणि डिजिटलायझेशनच्या साह्याने प्रलंबित प्रकरणांतून निष्फळ प्रकरणे तातडीने काढून टाकावीत. ४. केंद्र आणि राज्यांचे कालबाह्य व पुरातन कायदे रद्द करण्यात यावेत. ५. बनावट आणि उथळ प्रकारची प्रकरणे न्यायालयांत दाखलच होणार नाहीत, अशी यंत्रणा कार्यवाहीत आणावी.

या उपाययोजनांत दिरंगाई केली, तर सारी यंत्रणाच कोलमडून जाण्याचा धोका संभवतो. विकसनशील देश म्हणून वाटचाल करताना, प्रत्येक भारतीयाला कार्यक्षम आणि स्वतंत्र न्यायालयीन प्रणाली मिळायलाच हवी. इच्छाशक्ती, खरेपणा आणि सचोटीच्या बळावर एक अधिकारी काय करू शकतो, याचे उदाहरण तिरुनेल्ली नारायण अय्यर शेषन यांच्या रूपाने समोर आहे.

भारताचे दहावे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून त्यांनी निवडणूक आयोगाचे कामकाज असे काही करून दाखवले, की ग्रामपंचायतीच्या सदस्याच्या निवडणुकीपासून ते अगदी लोकसभेच्या निवडणुकीपर्यंत प्रत्येक उमेदवाराला महत्त्वपूर्ण माहिती सादर करायला भाग पाडले. सन १९८१मध्ये पारित झालेल्या कायद्याची त्यांनी फक्त ठामपणाने अंमलबजावणी करायला सुरुवात केली इतकेच! हे एकच उदाहरण कनिष्ठ न्यायालयांच्या न्यायवृंदाला त्यांची अधिकारकक्षा ठामपणे अमलात आणायला दिशादर्शक ठरावे.

**- ॲड. प्रदीप पाटील.**

---

## टुडेज ब्लॉग

# 'महाराजा'चा मरातब

**पत गमावत चाललेल्या एअर इंडियाला टाटा समूहाने पंखाखाली घेतले. प्रतिष्ठा दिली. नवे वलयही दिले. आता विस्तार' आणि एअर इंडिया यांच्या एकीकरणातून एअर इंडियाचा विश्वास दुणावेल आणि पंखांनाही नवे बळ येईल.**

--------------------

विश्वास आणि परिश्रमांचा संगम नेहमीच फलदायी ठरतो. या विशेषणांना प्रामाणिकतेची जोड दिल्यावर टाटा समूह तयार होतो. अशा या दिग्गज ब्रॅन्डला आणखी तेजोमय भविष्य लाभण्याचे संकेत आहेत. येणाऱ्या दिवसांत तुम्हांला एअर इंडियाचा सुवर्णकाळ दिसेल, अशी ग्वाही टाटा सन्सच्या अध्यक्षांनी जानेवारीत कर्मचाऱ्यांना लिहिलेल्या पत्रातून दिली होती. राष्ट्रीयीकरणामुळे सरकारी ताब्यात गेलेली विमानसेवा पुन्हा स्वत:कडे घेऊन टाटा समूहाने एक विलक्षण वर्तुळ पूर्ण केले होते. आता या समूहाकडून चांगली बातमी आली आहे. '५४ विमाने आणि साडेचारशे कर्मचारी असलेल्या विस्तार' या एअरलाइन्सचे एअर इंडियात विलिनीकरण होणार आहे. हवाई उद्योगाला भक्कम दिशा देण्याचे काम त्यातून होईल, अशी अपेक्षा आहे.



पत गमावत चाललेल्या एअर इंडियाला टाटा समूहाने पंखाखाली घेतले. प्रतिष्ठा दिली. नवे वलयही दिले. आता विस्तार आणि एअर इंडिया यांच्या एकीकरणातून एअर इंडियाचा विश्वास दुणावेल आणि पंखांनाही नवे बळ येईल.

जानेवारीतील अधिग्रहणानंतरचे महत्त्वाचे पाऊल म्हणून या विलिनीकरणाकडे बघितले जात आहे. येत्या तीन महिन्यात ही प्रक्रिया पूर्ण होईल. नव्या एअर इंडियाचे बाजारमूल्य एक अब्ज डॉलर एवढे होईल. त्यातून जागतिक पातळीवर 'महाराजा'चा मरातब वाढेल, यात काहीच शंका नाही.

सिंगापूर एअरलाइन्सचा यापूर्वीच म्हणजे १९९४ मध्ये भारतीय विमान वाहतुकीतील भागीदारीचा प्रयत्न होता. सन २०००मध्ये एअर इंडियातील वाटा खरेदीतही त्यांना रस होता. सन २०१३ मध्ये अस्तित्वात आलेली टाटा एसआयए एअरलाइन्स लिमिटेड ही विस्तारची होल्डिंग कंपनी आहे.

विमान वाहतुकीच्या क्षेत्रातील ही घडामोड अनेक संभाव्य शक्यतांची नांदी आहे. विस्तारातील अनेक माजी कर्मचाऱ्यांना एअर इंडियाने नोकरी दिली आहे. व्यवस्थापकीय संचालक कॅपबेल

विल्सन यांनी सिंगापूर एअरलाइन्समध्ये काम केले असल्याने तो सहजभाव विलयास सहायक ठरेल. यापूर्वी टाटा समूहाने एअर एशिया इंडियाच्या एअर इंडिया एक्स्प्रेससोबत विलिनीकरणाची घोषणा केलीच होती. पुढच्या वर्षीपर्यंत एअर एशिया ब्रॅन्ड समाप्त होईल.

टाटा समूहाने पाच वर्षांचे कणखर लक्ष्य निर्धारित केले असून एअर इंडियाचा देशांतर्गत वाटा तीस टक्क्यांनी वाढविला जाणार आहे. या विलयामुळे दोन कंपन्यांमधील स्पर्धा संपली असून नव्या भरारीसाठी टाटा समूह सज्ज होतो आहे. देशातील सामान्यांचे पाठबळ हे या भरारीला लाभलेले कोंदण आहे.

---

## बोधकथा

### सत्कृत्य



एका वनात एक पारधी राहत होता. त्याने खूप वन्य प्राण्यांची हत्या केली होती. त्यामुळे तो खूप पापी झाला होता. त्याची चाहूल लागली तरी वन्यप्राणी भीतीने प्राणी थरथर कापत असत. एकेदिवशी तो आपल्या शिकारीच्या शोधात असताना एका बेलपत्राच्या झाडावर चढला. खूप वेळ झाला तरी एकही शिकार त्याच्या हाती लागली नाही. तो खूप चिडला व बेलपत्राच्या झाडाचे एक एक पान खाली टाकू लागला. बराच वेळ हा त्याचा उद्योग चालू होता.

झाडाच्या बुंध्याशी बेलपत्राचा हा मोठा ढीग तयार झाला पण हे पारध्याला माहित नव्हते. त्या झाडाखाली एक महादेवाची पिंड होती. त्या पिंडीवर बेलाच्या पानांचा ढीग पाहून महादेव प्रसन्न झाले व ते पारध्याच्या समोर प्रकट झाले. त्यांना समोर पाहून पारधी आश्चर्यचकित झाला व म्हणाला,''महादेवा, मी खूप क्रूर आहे, अनेक वन्यप्राणी मारले आहेत, खूप हिंसा केली आहे, पाप खूप केले पण पुण्याचे एकही काम केलेले मला तरी आठवत नाही तरी पण आपण मला कसे बरे प्रसन्न झालात? यावर महादेव म्हणाले,''तू हिंसक आहेस, तुझ्या नकळत का होईना तू माझी पूजा केली आहेस. पूजा-प्रार्थना हे असे काम आहे की ते चुकून जरी घडले तरी त्याचे चांगलेच फळ मिळते. जर चुकून प्रार्थनेचे फळ इतके चांगले मिळत असेल तर नेहमी तर सत्कार्य केलेस तर किती फळ मिळेल? पारध्याला आपली चूक समजली व त्याने आयुष्यभर कष्ट करून जीवन जगला. **तात्पर्य:- एका सत्कृत्यामुळेदेखील आपले आयुष्य बदलून जाऊ शकते.**

---

## जन्म हा अखेरचा

### धर्माचारस्थल - ३



युवावस्थेत धर्माचा संग्रह करावा अशी वेदांची आज्ञा आहे. म्हणून प्रत्येकाने आपल्या तारुण्यावस्थेतच धर्मसंग्रह केला पाहिजे. ज्याच्या आयुष्यात धर्म प्रथम येतो तो कधी हिंसा करीत नाही, असत्य बोलत नाही, चोरी करीत नाही. येथे जे दहा धर्म सांगितले आहेत, त्यांचे पालन करूनच तुम्ही धार्मिक होऊ शकाल आणि धर्मामुळेच तुम्हांला ऐहिक आणि पारलौकिक सुखाचा लाभ होईल.

**धर्माचारस्थल - ४**

काशीक्षेत्राचे एक नाव 'महास्मशान' आहे. स्मशान प्रत्येक गावात असते. परंतु महास्मशान मात्र काशीक्षेत्र हेच होय. स्मशानात चितेवर मनुष्याचा केवळ स्थूल देहच जळतो. परंतु काशीच्या स्मशानात मात्र सूक्ष्मदेह देखील जळून जातो, म्हणून काशीला 'महास्मशान' असे म्हणतात. सूक्ष्म देह जळून जातो याचा अर्थ मनुष्याला पुनर्जन्म मिळत नाही. जोपर्यंत सूक्ष्म देह जीवंत असतो, तोपर्यंत जीवात्म्याला मुक्ती मिळत नाही. कारण सूक्ष्म देहातच सगळ्या वासना, सगळे संस्कार भरलेले असतात. जीवात्मा जेंव्हा स्थूलदेह सोडतो तेंव्हा आपल्या सूक्ष्म देहासोबत साऱ्या वासना, संस्कार घेऊन जातो. नवा जन्म घेताना नव्या शरीरात आपल्या सूक्ष्म देहासह प्रवेश करतो. अन्य स्मशानात केवळ स्थूल देह जळतो तर काशीच्या स्मशानात स्थूलदेहासह सूक्ष्मदेह देखील नष्ट होतो.

**(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

---

## जनमानस

### सामील का होऊ इच्छितात?

कर्नाटकाच्या मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्रातील जत तालुक्यातील गावांवर दावा केल्यावर महाराष्ट्रातील एरव्ही जहाल वक्तव्ये करणारे राजकीय नेते मवाळ भूमिका घेत शांत बसलेत असे चित्र महाराष्ट्रात निर्माण झाले आहे. आपसांत राजकारणातील मुद्द्यांवरून एकमेकांची उणी दुणी काढण्याच्या नादात त्यांना राज्यातील जनतेच्या मागण्यांकडे लक्ष देणे शक्य होत नसावे असे वाटते कारण अक्कलकोटमधील २८ गावांतील ग्रामस्थांनी महाराष्ट्र राज्य सरकारकडून रस्ते, वीज पाणी या सध्याच्या मूलभूत गरजा पूर्ण होत नसल्याचे सांगत आपला संताप व्यक्त केला आहे. या २८ गावांतील सरपंचांनी त्यांची गावे कर्नाटकात जाऊ देण्याचा ठराव मंजूर केला असल्याचा दावा केला आहे. अक्कलकोट आणि दक्षिण सोलापुरातील गावांमध्ये हीच भावना बळावत चालली आहे. भावनेच्या भरात स्थानिकांनी अशा इच्छा व्यक्त केल्या असल्या तरी आपल्या गावांचा कर्नाटक राज्यात समावेश झाल्यामुळे त्यांच्या सर्व समस्या दूर होतील का याची त्यांना खात्री देता येत नसली तरीही राज्यातील राजकीय नेते मंडळींनी त्यांची समजूत काढण्यात स्वारस्य दाखविलेले नाही. यावरून नेत्यांचा सीमावासीयांबद्दल असलेला आदर दिसून येतो. राजकीय दबावामुळे जर सीमेलगतच्या गावांचा कर्नाटकात समावेश केला गेलाच तर महाराष्ट्रातील नेतेमंडळी महाराष्ट्राच्या सीमेलगत फक्त आंदोलने, मोर्चे आयोजित करीत त्या घटनांचा निषेध करण्यापलीकडे काय कृती करू शकतील असे वाटत नाही. गेली सात दशके सीमावादावर तोडगा काढण्याच्या प्रयत्नांत राजकीय पक्षांनी आपल्या पोळ्या भाजून घेण्याशिवाय दुसरे काही साधलेले नाही. सीमावादावर न्यायालयात आपली बाजू बळकट करण्याचे प्रयत्न करण्याऐवजी न्यायालयाबाहेर लढण्याची आव्हाने देत सीमाप्रश्न धगधगत ठेवण्याचे प्रयत्न केले आहेत. राज्यातील नेत्यांनी सीमाभागातील जनतेवर केलेला अन्याय आणि सीमाप्रश्न नजीकच्या काळात सोडविला जाण्याच्या शक्यता त्यांना वाटत नसाव्यात म्हणूनच अक्कलकोट आणि दक्षिण सोलापुरातील ग्रामस्थांमध्ये कर्नाटकात सामील होण्याच्या इच्छा वाढीस लागल्या आहेत. राज्यातील सर्वपक्षीय नेत्यांनी यावरून बोध घेत राज्याचे हित साधावे असे वाटते.

**- राजन पांजरी, जोगेश्वरी.**

---

# दृष्टीकोन मांडण्याची प्रत्येकाला संधी

**भारतात लाखो कथा आणि त्या सांगणारे 'स्टोरीटेलर्स' आहेत आणि आपला देशात लोकांना गोष्टी ऐकायला आवडतात. काल्पनिक गोष्टी, लोककथा, लोकांचे जीवनानुभव आणि नुसत्या माहितीचेही कथन. उत्तम कल्पना आणि तिच्यावर विश्वास ठेवणारी टीम या गोष्टी असल्या, की त्यांना चांगले श्रोते मिळतात. लोकांना वादग्रस्त विषयांवरचे आणि संवादपर फॉरमॅट्ससुद्धा आवडत असल्याने तसेही अनेक पॉडकास्ट्स असतात.**

**निर्मितीतील सोपेपणा**

पॉडकास्टची निर्मिती अगदी सहज आणि सोपी आहे. कोरोना साथीच्या काळात मनोरंजन आणि माध्यमविषयक पारंपरिक प्लॅटफॉर्म्स तांत्रिक आवश्यकतांमुळे निर्मितीसाठी झगडत होते, तेव्हाही पॉडकास्ट्सच्या निर्मितीत मोठी वाढ झाली. पॉडकास्ट्स निर्माते ज्या गोष्टी शेअर करण्यासाठी आतुर होते, त्यांना त्याच्या निर्मितीसाठी आणि त्याबाबत नेमकेपणा आणण्यासाठी अधिक वेळ मिळाला.

**ब्रँड बिल्डिंगसाठी उपयुक्त**

अनेक गुंतागुंतीचे संदेश पॉडकास्टच्या माध्यमातून सहजपणे पोचवता येतात. एखाद्या ब्रँडला श्रोत्यांना खिळवून ठेवण्यासाठी त्याच्या उत्पादनाचे तपशील किंवा इतिहास सांगावेसे वाटतात, तेव्हा अशावेळी पॉडकास्ट्स हे



माध्यम विश्वासार्ह सहज ठरते. जाहिराती कमी असल्यामुळेही आशय मनात ठसण्यासाठी मदत होते. शिवाय पॉडकास्ट्सचे श्रोत्यांची मुळात त्यांच्या सामाजिक वर्तुळात माहिती जमा करण्यासाठी विशेष ओळख असते. पॉडकास्ट्समुळे संवाद पुढे नेण्यासाठी किंवा विविध विषयांवर चर्चेसाठी त्यांना खूप मदत होते. आपण श्रवणातून खूप काही शिकत असतो.

**सुखकर प्रवास**

दैनंदिन कामांत मग्न असताना पॉडकास्ट ऐकायला आवडते. त्यामुळे मजा वाढणे आणि शिकणे यांच्याबरोबरच वेळेचा कसा वापराबाबतही लक्ष देण्यास मदत होते.

ताज्या अभ्यासानुसार, २२ टक्के पॉडकास्ट श्रोते गाडी चालवताना, ११ टक्के श्रोते कामावर असताना, ८ टक्के श्रोते व्यायाम करत असताना, तर ४९ टक्के श्रोते घरी पॉडकास्ट्स ऐकतात. पॉडकास्ट सुरू करणे हे संगीत सुरू करण्यासारखेच सोपे असते.

पॉडकास्ट्सचे वैविध्य बघता आणि लोकांना माहिती मिळवण्यात आनंद मिळतो हे बघता, पॉडकास्ट्सनी इन्फोटेन्मेंटची जागा व्यापली असल्यास नवल नाही. ते मनोरंजनाचे एक प्रगल्भ आणि त्याचबरोबर विश्वासार्ह माध्यम आहे-ज्याद्वारे लोकांना सखोल संवादात स्वतःला बुडवून टाकता येते किंवा गुंतागुंतीच्या कल्पना समजून घेता येतात. जी गोष्ट सध्याच्या सोशल मीडियाच्या काळात विशेष आहे.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# सोलापूर जिल्हा परिषदेला तब्बल १२ पुरस्कार

सुराज्य/सोलापूर

महा आवास अभियान ग्रामीण अमृत महा आवास अभियान विभाग स्तरावरील उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था/व्यक्तींना सन २०२१-२२ सालातील पुरस्कार नुकतेच जाहीर झाले आहेत. विभागस्तरीय अंमलबजावणी, सनियंत्रण व मूल्यमापन समितीची सभा दि. ९ रोजी संपन्न झाली. सभेमध्ये पुणे विभागातून विभागस्तरावर निवड झालेल्या पुरस्कारांमध्ये सोलापूर जिल्ह्यास तब्बल बारा पुरस्कार जाहीर झाले.

पुरस्कार वितरण समारंभ दि.७ रोजी सकाळी ११.३० वाजता झुंबर हॉल, मुख्य विभागीय आयुक्त कार्यालय, विधान भवन पुणे येथे होणार असून या प्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांचा सन्मान होणार आहे. त्याचप्रमाणे प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, संबंधित तालूक्याचे तहसीलदार, गटविकास अधिकारी, संबंधित ग्रामपंचायतींचे सरपंच व ग्रामसेवक यांना निमंत्रित करण्यात आले आहे. महा



आवास अभियानाच्या यशस्वीतेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. कोरोना कालावधीत सातत्याने व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे व नंतर बैठकांमधून नियमितपणे आढावा घेतला जात होता. कार्यक्षेत्र भेटी दरम्यान आवास योजनांचा प्राधान्याने आढावा घेण्यावर सीईओ स्वामी यांचा प्रयत्न यामुळे सफल झाला आहे.

महा आवास योजनेचा नियमितपणे आढावा घेतला जात होता. सोलापूर जिल्ह्यातील पक्की घरे नसलेल्या कुटुंबांना पक्की घरे देण्यात बऱ्याच प्रमाणात यश मिळाले याचा मनस्वी आनंद होतोय. एखाद्याला हक्काचं घरकुल देणं ही बाब किती आनंददायी असते याची अनुभूती हे काम करीत असताना पदोपदी येत होती. परंतु प्रकल्प संचालक अर्जुन गुंडे, संतोष धोत्रे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी, गटविकास अधिकारी व कर्मचाऱ्यांचा हा खऱ्याअर्थाने सन्मान आहे.

**-दिलीप स्वामी (मुख्य कार्यकारी अधिकारी)**

### सोलापूर जिल्ह्याने प्राप्त केलेले पुरस्कार पुढीलप्रमाणे

▶ सर्वोत्कृष्ट जिल्हा पुरस्कार सोलापूर द्वितीय ▶ राज्य पुरस्कृत आवास योजना सर्वोत्कृष्ट तालुके अक्कलकोट - प्रथम, सांगोला - द्वितीय माळशिरस - तृतीय ▶ प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - निंबर्गी ता. दक्षिण सोलापूर - प्रथम, मंद्रुप ता. दक्षिण सोलापूर - तृतीय ▶ राज्य पुरस्कृत आवास योजना सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - भंडारकवठे ता. दक्षिण सोलापूर - तृतीय ▶ शासकीय जागा उपलब्धता सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे तालुके प्रधानमंत्री आवास योजना - माळशिरस - प्रथम ▶ वाळू उपलब्धता सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे तालुके प्रधानमंत्री आवास योजना अक्कलकोट - प्रथम, मोहोळ - द्वितीय ▶ वाळू उपलब्धता सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे तालुके राज्य पुरस्कृत आवास योजना अक्कलकोट - प्रथम मोहोळ - द्वितीय



## वीरशैव लिंगायत प्रीमियर लीग ऑक्शन सेरेमनी उत्साहात

**सोलापूर** : वीरशैव लिंगायत प्रीमियर लीगच्या ऑक्शन सेरेमनी (खेळाडू लिलाव प्रक्रिया) आणि पारितोषिकचे अनावरण हाय फ्लाय हॉटेल येथे करण्यात आले. यावेळी लीग चे अध्यक्ष महेश बिराजदार, प्रतीक आण्णा थोबडे, ॲड.बसवराजजी सलगर, केदारनाथ बिराजदार, प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजशेखर विजापूरे, निखिल थोबडे यांच्या उपस्थितीत पारितोषिकचे अनावरण करण्यात आले. वीरशैव लिंगायत प्रीमियर लीगच्या ऑप्शन प्रक्रियेत सुमारे ३५० खेळाडू असून राजेश अण्णा पाटील, अमित काबणे, गिरीश किवडे, महादेव कोगनुरे, अमित काबणे, महेश बिराजदार, शिवानंद हत्तुरे, परमेश्वर माळगे, सतीश तमशेट्टी, केदारनाथ बिराजदार, डॉ. अनिकेत पाटील, रामप्पा चिवडशेट्टी, महेश पटणे, सिद्धाराम जककापुरे, श्रीकांत धनशेट्टी या १६ संघ मालकांनी यामध्ये सहभाग नोंदवला. प्रत्येक संघाला खेळाडू ऑकशन साठी १ लाख पॉईंट्स देण्यात आले. तर सिद्धेश्वर वॉरियर्स या संघाने ५२ हजार पॉईंट्सने राहुल झिपरे या खेळाडूला सर्वाधिक पॉईंट्सने आपल्या संघात समावेश करून घेतले. या ऑक्शन प्रक्रियेमध्ये सर्व संघ मालक आणि खेळाडू यांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद लाभला. याप्रसंगी प्रशांत धुम्मा, गुरुनाथ निंबाळे, सुनील शरणार्थी, कैलास जेऊरे, कैलास मेंगाणे, महेश बेंबळगी स्वामी, विजयकुमार तंबाके, रोहित इटगी आणि मोठ्या प्रमाणावर खेळाडू उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरव जक्कापुरे व आभार आकाश हारकुड यांनी केले.




## मल्लिकार्जुन हायस्कूल येथे माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा

**सोलापूर** : मजरेवाडी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मल्लिकार्जुन हायस्कूल हत्तुरे नगर येथे सन १९९७-९८ दहावी बॅच माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे माननीय मुख्याध्यापक वैजिनाथ हत्तुरे सर होते. प्रमुख अतिथी धरेप्पा हत्तुरे, युसुफ शेख, वसंतराव सगर श्री सुनील घोळवे पर्यवेक्षक गिरमल्ला बिराजदार यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख अतिथी यांच्या शुभहस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. माजी विद्यार्थ्यातर्फे अध्यक्ष, प्रमुख अतिथी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा शाल व बुके देऊन सत्कार करण्यात आला. प्रशालेतर्फे माजी विद्यार्थ्यांचा गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आले. माजी विद्यार्थ्यांनी यावेळी स्वपरिचय करून दिला. या बॅचचे विद्यार्थी डॉक्टर, शिक्षक, इंजिनियर अशा मोठ्या पदावर कार्यरत आहेत व काही विद्यार्थी अमेरिकेतही नोकरी करत आहेत. श्रीदेवी हत्तुरे, शिवराज ढाले, डॉ.सचिन बांगर, डॉ. महेश आगलावे डॉ. सिद्धेश्वर कोणदे,केदार बेंबळकर, संतोष बिराजदार,जगदेवी हुगार सविता हरकरे या माजी विद्यार्थ्यांनी प्रशालेबद्दल स्नेह, कृतज्ञता, गौरवोदगार या भावना आपल्या मनोगतात व्यक्त केले. यावेळी युसुफ शेख, वसंतराव सगर, सुनील घोळवे, मारुती माने, पर्यवेक्षक गिरमल्ला बिराजदार, सविता कुलकर्णी यानी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक वैजिनाथ हत्तुरे सर यांनी आपल्या मनोगतात जबाबदारी पार पाडत असताना, संकटाला सामोरे जात असताना संयम बाळगणे खूप महत्त्वाचे आहे आणि माजी विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिले. या कार्यक्रमास माजी विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



## बसवेश्वर वाचनालयास आ.सुभाष देशमुख यांनी दिला निधी

**सोलापूर** : आ.सुभाष देशमुख यांनी सन २०२२-२०२३च्याआ.स्थानिक विकास निधी अंतर्गत १.५० लाख रुपये किंमतीची फर्निचर व पुस्तके साठी जुळे सोलापूर भागातील २७ वर्षांपासून ग्रंथालय आपल्या दारी हा उपक्रम राबविणाऱ्या श्री बसवेश्वर सार्वजनिक वाचनालयास निधी उपलब्ध करून दिल्या बद्दल संस्थेच्या वतीने अध्यक्ष ऋषिकेश बेडगे यांनी आ.सुभाष देशमुख यांचा पेढा भरवून शाल व नॅपकीन बुके देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी अनुराधा बेडगे, नागेश जोकार तसेच महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी संघ पुणे विभागाचे अध्यक्ष तथा संस्था सचिव सदाशिव बेडगे उपस्थित होते.

## विवेक वर्धिनीत साहित्यिक व माजी विद्यार्थी खिल्लारे यांचा सत्कार

**सोलापूर** : विवेक वर्धिनी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय या प्रशालेतून आजवर विविध क्षेत्रातील उच्च पदावरअनेक माजी विद्यार्थ्यांनी स्थान मिळवले असून कला,क्रीडा, साहित्य, शिक्षण, आरोग्य, राजकीय,सामजिक, स्थापत्य ,अशा अनेक क्षेत्रांमध्ये विद्यार्थी चमकत आहेत.त्यापैकी साहित्य क्षेत्रामध्ये प्रशालेचे माजी विद्यार्थी बाळासाहेब खिल्लारे यांच्या कादंबरीला राष्ट्रीय संत नामदेव कादंबरी साहित्य पुरस्कार मिळाला आहे.सध्या खिलारे हे औंध पुणे येथे महावितरण मध्ये कार्यरत असून त्यांनी नुकतीच प्रशालेला भेट दिली त्यावेळी प्रशालेचे प्राचार्य राजेंद्र पाराध्ये यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी खिलारे यांनी विवेक वर्धिनी हे ज्ञानाचे भांडार असून ज्ञानदाना बरोबरच,संस्कार, शिस्त यांचे धडे मिळतात या प्रशालेच्या व संस्थेच्या मार्गदर्शना मुळेच आपणास यश मिळाले आहे असे मनोगत व्यक्त केले.यावेळी मार्गदर्शक शिक्षक राजूभाई मुलाणी, शिवाजीराव येडवे,सुनिल विश्वासे,तसेच विजय कर्नेकर,अनिल सोनार,तानाजी चोपडे व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## उस्मानाबाद पोलीस कार्यालयासमोर आत्महत्येचा प्रयत्न

सुराज्य/सोलापूर

आपली तक्रार का घेत नाही या कारणावरून एका ३२ वर्षीय इसमाने उस्मानाबाद पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला.ही घटना गुरुवारी दुपारच्या सुमारास घडली. अमोल बाबासाहेब लोंढे (वय ३२ रा. वजवडा ता.वाशी जि.उस्मानाबाद) असे विष प्राशन केलेल्या इसमाचे नाव आहे. त्याला उस्मानाबाद येथे प्राथमिक उपचार करून नानासाहेब (भाऊ) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले.




**वहिरींत मृतदेह आढळला**

आचेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथील दुधनी यांच्या शेतातील विहिरींत दरेप्पा चंद्राम धरगोंडा (वय ६० रा.नागणसूर हल्ली आचेगाव) या इसमाचा मृतदेह आढळून आला ही घटना शुक्रवारी सकाळी उघडकीस आली. या घटनेची नोंद वळसंग पोलिसात झाली. सहाय्यक फौजदार जमादार तपास करीत आहेत.

**रेल्वेतून पडल्याने मृत्यू**

कुर्डूवाडी रेल्वे स्थानका जवळ धावत्या रेल्वेतून पडल्याने ३२ वर्षीय अनोळखी तरुण गंभीर जखमी होऊन उपचारादरम्यान मरण पावला. काल गुरुवारी दुपारी हा प्रकार घडला होता. त्याला कुर्डूवाडी येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात हवालदार पाटील(लोहमार्ग) यांनी दाखल केले होते. मात्र तो उपचारापूर्वीच मयत झाला.कुर्डूवाडी रेल्वे पोलिसात याची नोंद झाली आहे.

**कोयत्याने मारहाण वृद्ध दांपत्य जखमी**

गुंजेगाव अकोला (ता.मोहोळ) येथील वस्तीवर पैशाच्या वादातून कोयता आणि दगडाने केलेल्या मारहाणीत बबन मोहन सोलंकी (वय ८०) आणि त्यांची पत्नी शशिकला (वय ७०रा.हिंगोली) हे जखमी झाले. ही घटना शुक्रवारी सकाळच्या सुमारास घडली. त्यांना सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. पैशाच्या वादातून संतोष सोलंकी, अंकुश सोलंकी आणि इतर दोघांनी मारहाण केली.अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.



## सोलापूरसह इतर पाचही जिल्ह्यातील विमानसेवा लवकरच सुरू करू : शिंदे

सुराज्य/सोलापूर

सोलापूर सह इतरही पाच जिल्ह्यातील रखडलेली विमानसेवा लवकरच सुरू करणार असल्याचे प्रतिपादन केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी सोलापूरहून दिल्ली भेटीसाठी गेलेल्या शिष्टमंडळाच्या बैठकीत सांगितले.

सोलापुरात मागील महिनाभर सोलापूर विमान सेवेचा प्रश्न गाजत असताना मध्येच धर्मराज काडादी आणि केतनशहा या दोघात शाब्दिक चकमक झाली होती त्यानंतर त्या प्रकरणाला वेगळेच वळण लागले होते. त्यावर ते प्रकरण राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि केंद्रीय हवाई मंत्री यांच्यापर्यंत पोहोचले होते. त्यामुळे या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी लागली होती. त्यानुसार महाराष्ट्राचे चेंबर ऑफ कॉमर्सचे राज्याचे अध्यक्ष ललित शहा, केतन शहा यांच्याबरोबर सोलापुरातील शिष्टमंडळाची हवाई मंत्री ज्योतीरादित्य शिंदे यांच्याबरोबर गुरुवारी दिल्ली येथे बैठक झाली.

## दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांग संसदेचे आयोजन

**सोलापूर** : जागतिक दिव्यांग दिनानिमित्त समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद,सोलापूर यांच्या वतीने सकाळी ११.०० वाजता दिव्यांग संसदेचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह येथे करण्यात येणार आहे.सदर कार्यक्रमाचे उदघाटन जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर,मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, यांच्या हस्ते होणार आहे.



कार्यक्रमाची प्रस्तावना सुनिल खमितकर, जिल्हा समाज कल्याण अधिकारी,जिल्हा परिषद,सोलापूर हे करणार आहे. न्यायमुर्ती, नरेंद्र नरसिंह जोशी हे दिव्यांग अधिनियम २०१६ बाबत मार्गदर्शन करणार आहेत. शमा पवार, निवासी उपजिल्हाधिकारी या दिव्यांगासाठी आवश्यक असणाऱ्या विविध दाखल्याबाबत मार्गदर्शन करणार आहेत तसेच डॉ.प्रदिप ढेरे हे दिव्यांगाना देण्यात येणाऱ्या दिव्यांगत्वाच्या प्रमाणपत्राबाबत मार्गदर्शन करणार आहेत तसेच ड.लक्ष्मण मारडकर हे विधि सेवा प्राधिकारणामार्फत दिव्यांगाना मोफत कायदयाबाबत सल्ला या वर मार्गदर्शन करणार आहेत तसेच मनिष उपाध्ये हे दिव्यांगाना येणाऱ्या विविध समस्या व अडचणी याबाबत मार्गदर्शन करणार आहेत शिंदे हे दिव्यांगासाठी असणारे लघू व सुक्ष्म उद्योग याबाबत मार्गदर्शन करणार आहेत.प्राचार्य,शासकीय औद्यगीक प्रशिक्षण केंद्र, सोलापूर हे दिव्यांगासाठी असणाऱ्या विविध व्यवसाय शिक्षणाबाबत मार्गदर्शन करणार आहेत.

अपंग वित्त विकास महामंडळाचे व्यवस्थापक दिव्यांगाना असणाऱ्या व्यवसायासाठी असणारे कर्ज योजनाबाबत मार्गदर्शन करणार आहेत. व्यवस्थापक, अग्रणी बॅक, बॅक ऑफ इंडिया दिव्यांगासाठी असणाऱ्या रोजगार भांडवली योजनाबाबत मार्गदर्शन करणार आहेत.सच्चिदानंद बांगर, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, दिव्यांगासाठी असणारे विविध योजनाबाबत मार्गदर्शन करणार आहेत तसेच सूरज ओहाळ समन्वयक, सर्वशिक्षा अभियान बाबत मार्गदर्शन करणार आहेत. कमलाकर तिकटे राष्ट्रीय न्यास अधिनियम १९९९ बाबत मार्गदर्शन करणार आहेत. दिव्यांगाच्या प्रत्येक प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मिळण्यासाठी दिव्यांग संसदेचे आयोजन करण्यात आले आहे.




ब्युटी पार्लर मोफत प्रशिक्षणाचा शुभारंभ

## झुआरी सिमेंटच्या माध्यमातून दातृत्व जपण्याचा प्रयत्न : दीपक कक्कर

**अक्कलकोट** : झुआरी सिमेंट कंपनीच्या माध्यमातून या परिसरातील अनेक गावांमध्ये सामाजिक दातृत्व जपण्याचा प्रयत्न आम्ही करत असून आजपर्यंत कंपनीने या परिसरातील नागरिकांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केला आहे. आगामी काळात देखील आपण ब्युटी पार्लर मोफत प्रशिक्षणाच्या माध्यमातून अनेक महिलांना सक्षम करण्याबरोबरच इतर सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे झुआरी सिमेंटचे प्लांट हेड दीपक कक्कर यांनी सांगितले.

झुआरी सिमेंट लिमिटेड हेडलबर्गसेमेंट ग्रुप,औज (आहेरवाडी) यांच्या वतीने ब्युटीशियन बेसिक सर्टिफिकेशन मोफत कोर्स हा जवळपास प्रामुख्याने २० महिलांकरिता ३ महिन्याच्या कालावधी साठी सुरुवात करण्यात आली आहे. यावेळी व्यासपीठावर झुआरी सिमेंट लिमिटेडचे प्लांट हेड,व्हाईस प्रेसिडेंट वर्क्स दिपक कक्कर, रुची दिपक कक्कर, सोलापूर नुपूर ब्युटी पार्लरचे प्रमुख, प्रशिक्षीका अनिता क्षीरसागर, झुआरी सिमेंट लिमिटेड चे असिस्टंट मॅनेजर अमोल जाधव आदींची प्रमुख उपस्थिती होती. हा कोर्स दक्षिण सोलापूर तालुक्यातील शिंगडगाव, औज येथील महिलांसाठी ब्युटी पार्लर मोफत प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. प्रशिक्षण ३ महिन्यांचे असून या प्रशिक्षणानंतर प्रमाणपत्र व कीट देणार असल्याचे सांगितले.झुआरी सिमेंट कंपनीच्या रुची कक्कर बोलताना म्हणाल्या,झुआरी सिमेंटने महिलांसाठी केलेले काम आणि आगामी काळात महिलांसाठी कंपनी घेत असलेल्या निर्णय हे कौतुकास्पद आहे. यावेळी सोलापूर ब्युटी पार्लर नुपूरच्या प्रमुख व प्रशिक्षिका अनिता क्षीरसागर यांनी महिलांना प्रशिक्षणाबद्दल माहिती दिली. आगामी काळामध्ये महिला स्वावलंबी आर्थिक सक्षम करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.तसेच तीन महिन्याच्या प्रशिक्षण कोर्स असून हा कोर्स पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र व कीट वाटप केले जाणार असल्याचेही यावेळी अनिता क्षीरसागर यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक झुआरी सिमेंट लिमिटेडचे प्लांट हेड,व्हाईस प्रेसिडेंट- वर्क्स दिपक कक्कर यांनी केले तर सूत्रसंचालन झुआरी सिमेंट चे भूषण पातुर्डे यांनी केले तर आभार सुभाषिश दास यांनी मानले.यावेळी झुआरी सिमेंट लिमिटेड चे सर्व स्टाफ व औज, शिंगडगाव परिसरातील प्रशिक्षणार्थी, महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अकलूज येथील शाळेत विद्यार्थ्याला मारहाण करून दात पाडले; ५ जणांविरुद्ध गुन्हा

**सोलापूर** : धक्का लागल्याच्या किरकोळ कारणावरून लाथाबुक्क्या आणि दगडाने केलेल्या मारहाणीत एका १७ वर्षीय विद्यार्थ्यांचे ३ दात पडून तो गंभीर जखमी झाला. ही घटना अकलूज येथील सदाशिवराव माने विद्यालयाच्या मैदानात गुरुवारी दुपारच्या सुमारास घडली.

इमरान शौकत शेख (वय १७ रा. पद्मावती नगर, बागेचीवाडी ता.माळशिरस) असे जखमी झालेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे. त्याला अकलूज येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. इमरान शेख हा समावि शाळेत १०वी इयत्तेत शिकण्यात आहे. काल दुपारी बारा वाजेच्या सुमारास तास संपल्यानंतर तो इतर विद्यार्थ्यांसोबत मैदानाकडे मॅच बघण्यासाठी निघाला होता.




त्यावेळी त्याच्या मित्राचा दुसऱ्या एका विद्यार्थ्याचा धक्का लागला. त्यामुळे त्यांच्या भांडण सुरू झाले. शेख हा भांडण सोडवित असताना एकाने दगड घेऊन तोंडावर मारल्याने इम्रान शेख हा गंभीर जखमी झाला. शाळेतील शिक्षकाने त्याला त्वरित अकलूज येथील रुणालयात दाखल केले. त्यानंतर त्याला सोलापुरात नेण्यात आले. दरम्यान इम्रान शेख याने दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी पाच जणांविरुद्ध गटबाजी करून मारहाण केल्याचा गंभीर गुन्हा दाखल केला. हवालदार पठाण पुढील तपास करीत आहेत.

## संभाजी ब्रिगेडच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त अधिवेशन

### साहित्यिकांना जीवन गौरव पुरस्कार : शाहू महाराज, शरद पवाराची उपस्थिती

सुराज्य/सोलापूर

संभाजी ब्रिगेडच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त पुण्यामध्ये एक दिवशी अधिवेशन होणार आहे. या अधिवेशनामध्ये चर्चासत्र आणि थोर साहित्यिकांचा गौरव केला जाणार आहे. या अधिवेशनासाठी कोल्हापूरचे शाहू महाराज आणि राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार उपस्थित राहून मार्गदर्शन करणार असल्याची माहिती संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांनी दिली.

सभाजी ब्रिगेड या सामाजिक संस्थेची १९९७ रोजी स्थापना झाली २०२२ मध्ये २५ वर्षे पूर्ण होत आहेत. या वर्षा निमित्त एक दिवसीय अधिवेशन भरवण्यात येणार आहे. यासाठी प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड हे महाराष्ट्राचा दौरा करत आहेत. त्या निमित्ताने सोलापूर दौऱ्यावर आले असता आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

सदरचे अधिवेशन सकाळी दहा ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत होणार आहे. उद्घाटनाचे सत्र झाल्यानंतर चर्चासत्राचे आयोजन केले आहे पहिल्या सत्रामध्ये संवाद बहुजन समाजाची या चर्चासत्राचे आयोजन केले आहे. विविध जाती धर्मामध्ये विविध प्रदेश पातळीवर काम करणाऱ्या सर्व नेत्यांना या चर्चासत्रांमध्ये सहभाग होऊन त्यांच्याशी संवाद साधला जाणार आहे. दुसरे चर्चा सुद्धा आरक्षणातून




अर्थकरण या विषयावर घेतले जाणार आहे. मराठा आरक्षणासाठी मराठा समाजाने मोठी चळवळ उभी केली. मात्र आरक्षण काही गेली ४० वर्षे झाले मिळाले नाही. १०३ वी घटना दुरुस्ती झाली मात्र लागू झालेल्या आरक्षण देखील मिळालं न्यालयालाने रद्द केले. त्यामुळे आरक्षणाचा लढा कितपत यशस्वी झाला मागोवा घेऊन आरक्षणातून अर्थकारण या विषयावर चर्चा सत्र होणार आहे. सध्या जागतीकरण वाढत आहे. सरकारी क्षेत्राचे खाजगी करण केले जात आहे त्यामुळे अरक्षण मिळून काय उपयोग याबाबत चर्चा केली जाणार आहे.याचा विचार करता जगभर उद्योग आणि शिक्षणासाठी गेले पाहिजे याबाबत प्रबोधन या चर्चा सत्रा मध्ये केले जाणार आहे. संभाजी ब्रिगेडने शाहु महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांचा वारसा चालवावा. आ. ह. साळूंखे, जयसिंगराव पवार, यांचा जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरव केला जाणार असल्याचे गायकवाड यांनी सांगितले.

# खबरदार कारखाना बंद पाडाल तर धनगर समाज पेटून उठेल

## राधाकृष्ण पाटील यांचा इशारा

## काडादींची भेट घेऊन दिला पाठिंबा

सुराज्य/सोलापूर

**श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्यास कटकारस्थान करून काही राजकीय दबावापोटी बंद करण्याचा प्रयत्न चालू आहे. श्री सिध्देश्वर साखर कारखाना हा सोलापूर जिल्ह्यातील हजारो शेतकरी व कामगारांच्या जीवनाचा आधार आहे. त्यामुळे खबरदार कारखाना बंद पाडल्यास धनगर समाज पेटून उठेल असा इशारा धनगर समाजाचे नेते राधाकृष्ण पाटील यांनी दिला आहे. काडादी यांची भेट घेऊन पाठिंबा देखील जाहीर केला आणि काडादी यांना धनगर समाजाचे प्रतीक काठी घोंगडे भेट दिले.**



जिल्ह्याच्या एकूण आर्थिक जडणघडणमध्ये महत्त्वाची भूमिका आहे. सध्या सोलापूर विमानतळ वरून जे काही आंदोलन चालू आहे. त्यामध्ये शेतकरी बांधवांचे नुकसान मोठ्या प्रमाणात होणार आहे. सोलापूर विमानसेवा चालू करण्यासाठी आमचा कोणताही विरोध नाही. बोरामणी आंतरराष्ट्रीय विमानतळाची जागा उपलब्ध असताना शहरी भागात असणाऱ्या होटगी रोडवरील सोलापूर विमानतळाचा का आग्रह धरला जात आहे. चिमणी न पाडता विमानसेवा करू शकतो. सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचा कारभार हा अत्यंत पारदर्शी असून, उच्च दर देणारा कारखाना म्हणून श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याची ओळख आहे.

शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेणारा हा साखर कारखाना काही नेत्यांना पाहवत नाही. यामुळेच गाळप हंगाम बंद पाडण्याचे षड्यंत्र रचले जात आहेत. त्यामुळे कामगार, शेतकरी यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे. हजारो शेतकऱ्यांचे भवितव्य ह्या कारखान्यावर अवलंबून आहे प्रशासनाने कारखाना बंद पाडला तर धनगर समाज रस्त्यावर उतरून तीव्र स्वरूपात आंदोलन करेल, असे पाटील म्हणाले.

यावेळी उपाध्यक्ष सिद्धाराम जानकर, तालुकाध्यक्ष अण्णाप्पा सत्तूबर, उपाध्यक्ष बाजीराव बुळगुंडे, अश्विनी सहकारी रुग्णालयाचे संचालक विलास पाटील, माजी परिवहन सभापती विजयकुमार हत्तुरे, विकास पाटील, नानासाहेब नंद्राळ, श्रीमंत डोमनाळे इतर समाज बांधव बहुसंख्येने उपस्थित होते.



## एड्स्‌दिनानिमित्त महाडिकांना साधला मुलांशी संवाद

**सुराज्य/विरवडे** : राजकारणाच्या पलिकडे जाऊन समाजहिताचे काम करणारे घराणे म्हणून प्रसिध्द असणारे महाडिक परिवार! १ डिसेंबर एड्स दिनाचे औचित्य साधून खा. धनंजय महाडिक यांच्या संकल्पनेतून त्यांचा मुलगा व भिमा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन विश्वराज महाडिक यांनी पंढरपूर तालुक्यातील पालवी या अनाथ व भेट दिली. एड्सग्रस्त मुलांच्या संस्थेतील सर्व मुलांबरोबर संवाद साधला. यावेळी त्या निरागस मुलांच्या चेहऱ्यावरचे हावभाव बघून विश्वराज महाडिक यांच्या डोळ्यात अश्रू अनावर आले.




## जिल्हास्तरीय शालेय बॉलबॅडमिंटन स्पर्धेत इंडियन मॉडेल स्कूलचे यश

**सुराज्य/अक्कलकोट** : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा बॉलबॅडमिंटन असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने मंगळवेढा येथे आयोजित करण्यात आलेल्या १७ वर्षाखालील मुलींच्या गटात इंडियन मॉडेल स्कूल अक्कलकोटने प्रथम क्रमांक मिळवत यश संपादन केले. विजयी संघातील खेळाडू - श्वेता घटकांबळे (कॅप्टन), रितिका भरमशेट्टी, स्वराली सुरवसे, श्रावणी जलवादी, सुमन फुलारी, मानसी स्वामी, प्रांजली प्रचंडे, भाग्यश्री देशमुख. या संघाला शाळेचे क्रीडाशिक्षक सतीशकुमार परदेशी, क्रीडा सहशिक्षक दयानंद दणुरे, बॉलबॅडमिंटन प्रशिक्षक राहुल माने यांचे मार्गदर्शन लाभले. शाळेचे संस्थापक अध्यक्ष माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे व संस्थेचे उपाध्यक्ष अमोल जोशी, सायली जोशी, शितलताई म्हेत्रे, ममता बसवंती, मुख्याध्यापिका गौरी दातार व प्राचार्य डॉ. गणपती वाघमोडे तसेच पालक शिक्षक व शिक्षकेतर वर्गाने अभिनंदन केले.



## पार्थ साळुंखे यांचे वेटलिफ्टिंगमध्ये यश

**सुराज्य/अकलूज** : कराड येथे झालेल्या स्पर्धेमध्ये अकलूज येथील विद्यार्थ्यांनी अद्वितीय संपादन केले असून त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.


महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळ आणि IEDSS अंतर्गत कराड येथे झालेल्या वेटलिफ्टिंग स्पर्धेमध्ये सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी अँड रिसर्च महाविद्यालयातील १०५ + किलो वजन गटात पार्थ रणजीत साळुंखे प्रथम, १०५ किलो गटात रुद्रतेज अमरसिंह माने देशमुख द्वितीय तर प्रथमेश तानाजी माने-देशमुखने ६९ किलो वजन गटात राज्यात तृतीय क्रमांक मिळवला आहे. हे तिघेही शंकरनगर येथील स. म. शंकरराव मोहिते-पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी अँड रिसर्च महाविद्यालयातील विद्यार्थी आहेत. शिवरत्न बंगल्यावर पारितोषिक विजेत्या तिन्ही विद्यार्थ्यांचा सत्कार स. म. शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी इंजिनिअरिंग कॉलेजचे प्रभारी प्राचार्य सागर नारायण फुले, महाविद्यालयाचे क्रीडा प्रमुख अभिजित गौतम कांबळे, कार्यालयीन अधीक्षक विक्रमसिंह प्रमोद बागल, विभाग प्रमुख स्वप्निल मारुती निकम, शिक्षकेतर कर्मचारी शिवाजी पराडे उपस्थित होते. यावेळी आ. रणजितसिंह मोहिते-पाटील, भाजपा नेते धैर्यशील मोहिते-पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, प्रताप क्रीडा मंडळाचे अध्यक्ष स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## सुळेवाडीत पिलीव केंद्राची शिक्षण परिषद

**सुराज्य/पिलीव** : माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी येथे पिलीव केंद्राची शिक्षण परिषद सुळेवाडी येथील जि. प. प्राथ. शाळेत संपन्न झाली. परिषदेची सुरुवात सुळेवाडी येथील जि. प. शाळेचे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बाजीराव सुळे यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी ऐवळे, अप्पासाहेब पोतदार व राजू चौरे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी माजी सरपंच नाथा सोलंकर, करते, प्रभारी केंद्रप्रमुख राजेंद्र सुरवसे, पिलीव केंद्रातील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक उपस्थित होते.


## निधन वृत्त

### विमल हांडे



**सुराज्य/मोहोळ** : विमल दत्तू हांडे रा. गोटेवाडी, ता. मोहोळ यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७० वर्षाच्या होत्या. पांडुरंग वाघमोडे वायरमन यांच्या त्या आजी होत. त्यांच्या पश्चात दोन मुले, चार मुली, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा अंत्यसंस्कार गोटेवाडी हांडे वस्ती येथे करण्यात आला.

### जयश्री क्षीरसागर



**सुराज्य/मोहोळ** : येथील गवत्या मारुती चौकात राहणाऱ्या जयश्री भीमराव क्षीरसागर (वय ६०) यांचे अल्पशा आजाराने बुधवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुली, एक मुलगा, सून, नातू असा परिवार आहे.




## राजेंद्र गिरमे यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत नेत्र तपासणी शिबिर

सुराज्य/माळीनगर

माळीनगर ग्रामपंचायतीचे मार्गदर्शक, दि सासवड माळीशुगर फॅक्टरीचे एम. डी. राजेंद्र भाऊ गिरमे यांच्या वाढदिवसानिमित्त विनामूल्य डोळे तपासणी शिबिर ग्रामपंचायत माळीनगरच्यावतीने घेण्यात आले.

राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन फेस्टिव्हलचे अध्यक्ष सासवड माळी एज्युकेशन सोसायटीचे संचालक पृथ्वीराज भोंगळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संचालक सतीश आप्पा गिरमे, सरपंच अभिमान जगताप, उपसरपंच नागेश तूपसुंदर, माजी उपसरपंच संग्राम भोसले महादेव बंडगर डॉ. दीपक लोंढे, ग्रामविकास अधिकारी सचिन बनकर, साई नेत्र रुग्णालय डॉ. जगदाळे संभाजी केंगार, प्रकाश कांबळे रमजान इनामदार, ग्रा. पं. क्लार्क अमर डावरे, रमेश जगताप, धुमाळ मास्तर, मिथुन नाईकनवरे, बाळू कोडक उपस्थित होते.

यावेळी ५० लोकांचे ऑपरेशन तपासणी आणि १२५ लोकांनी तपासणी शिबिराचा लाभ घेतला.

## काळमवाडीत सरपंचपदासाठी ४ अर्ज दाखल

सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील काळमवाडी ग्रामपंचायत निवडणुकीत आज अर्ज दाखल करण्याच्या अंतीम दिवशी सरपंचपदासाठी दोन्ही गटाकडून ४ उमेदवारी अर्ज तीन प्रभागातून सदस्य पदासाठी ३६ अर्ज दाखल करण्यात आले असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तपासे यांनी सांगितले.

येत्या ५ तारखेला छाननी होणार असून ७ डिसेंबरला माघार आहे. माघारीनंतरच याठिकाणी चित्र स्पष्ट होणार आहे. पण यंदाच्या निवडणुकीत कमालीची चुरस निर्माण झाली आहे.




## कल्याणशेट्टी माध्यमिक विद्यालयात पालकसभा

सुराज्य/अक्कलकोट

महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक सभा घेण्यात आली.

अध्यक्षस्थानी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी हे होते तर प्रमुख उपस्थित म्हणून संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, सीईओ रूपाली शहा, ज्युनिअर कॉलेज प्रमुख पूनम कोकळगी, प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी व पर्यवेक्षक मोतीलाल चव्हाण हे होते. यावेळी सर्व उपस्थितांचे स्वागत प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी यांनी केले तर प्रास्ताविकात मोतीलाल चव्हाण यांनी सभेपुढील विषय व सभेचे उद्देश व्यक्त केले. खंडेराव घाटगे यांनी शालेय उपक्रमांची माहिती दिली.

यावेळी आदर्श पालक आणप्पा भुरले, लक्ष्मीपुत्र टपाले, विद्या बुधवंत, इस्माईल शेख, निरंजन क्षीरसागर, सविता घंटे व पायल पवार या पालकांचा सत्कार करण्यात आला. कल्पना स्वामी, पूजा कडबगावकर गौरीशंकर कोनापुरे व सुरेश रुग्गे या इंग्रजी, विज्ञान, गणित शिक्षकांनी आपल्या विषयाचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या NMMS, ५वी ८ वी स्कॉलरशिप परीक्षा, स्पर्धा परीक्षा, टॅलेंट सर्च, विज्ञान प्रदर्शन इत्यादी स्पर्धा परीक्षेसाठी घेण्यात येणाऱ्या तासिकाबद्दल माहिती दिली. यावेळी पालकांनी ही मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले की, 'बदलत्या परिस्थितीनुसार विद्यार्थ्यांवर पालकांनी व शिक्षकांनी संस्कार केले पाहिजे तसेच विद्यार्थी वर्तणूक, आरोग्य, स्वच्छता व आहार याविषयी मार्गदर्शन केले.

## मंगळवेढ्यातील १८ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदासाठी ११८ तर सदस्यपदासाठी ६२६ अर्ज दाखल

सुराज्य/मंगळवेढा

मंगळवेढा तालुक्यातील १८ ग्रामपंचायतीसाठी शेवटच्या दिवशी सरपंच पदासाठी ११८ तर सदस्य पदासाठी ६२६ असे अर्ज दाखल झाले आहेत. दरम्यान,आज शेवटचा दिवस असल्यामुळे उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी तहसील आवारात एकच गर्दी उसळली होती.

गावनिहाय सरपंच व उमेदवारी अर्ज पुढीलप्रमाणे -

खोमनाळ सरपंच-६,सदस्य -३५,भालेवाडी -सरपंच -५,सदस्य -३१,पौट -सरपंच ६,सदस्य-३१,बावची -सरपंच-१०,सदस्य -२४,गुंजेगाव -सरपंच -५,सदस्य -३४,ढवळस -सरपंच -९,सदस्य -३७,शिरनांदगी -सरपंच -६,सदस्य -४०, मारोळी- सरपंच -७,सदस्य -३३, रहाटेवाडी -सरपंच -३,सदस्य -२७, डोंगरगाव -सरपंच ८, सदस्य -५२, हाजापूर -सरपंच -३,सदस्य -१०,गोणेवाडी -सरपंच-६, सदस्य -३८, येड्राव-सरपंच -९, सदस्य -३९,मारापूर -सरपंच -७,सदस्य -४१,सोड्डी -सरपंच-५,सदस्य -२८, तळसंगी -सरपंच -५,सदस्य -५४,पाटखळ -सरपंच -१३, सदस्य-४९,फटेवाडी -सरपंच-५, सदस्य -२३ असे १८ ग्रामपंचायत सरपंचपदासाठी एकूण ११८ तर सदस्य पदासाठी ६२६ उमेदवारी अर्ज शुक्रवार अखेर प्राप्त झाले आहेत.

दरम्यान आज उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असल्यामुळे राजकिय गटातील व्यक्तींनी आपले शक्तिप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज दाखल केले.परिणामी तहसील कार्यालयास आज जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.सर्वात कमी सरपंचपदासाठी अर्ज रहाटेवाडी व डोंगरगांव येथे प्रत्येकी ३ अर्ज आले तर सर्वाधिक सदस्यासाठी ५४ अर्ज तळसंगी ग्रामपंचायतीसाठी आले आहेत.

## शंकरराव मोहिते-पाटील राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्य पुरस्काराची घोषणा

सुराज्य/अकलूज

**अकलूज येथील श्री विजय गणेशोत्सव पब्लिक ट्रस्टच्यावतीने सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्य पुरस्कार देण्यात येणार आहे. या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी राज्यातील साहित्यिकांनी आपल्या साहित्यकृती ट्रस्टकडे पाठवण्याचे आवाहन ट्रस्टचे कार्याध्यक्ष आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी केले आहे. १४ जानेवारीला सहकार महर्षींच्या जयंतीच्या दिवशी या पुरस्काराचे वितरण होणार आहे.**

२५ हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. मराठी भाषेतील कथा, कादंबरी, कवितासंग्रह, चरित्र, आत्मचरित्र, ललित लेखन, वैचारिक समीक्षात्मक लेखन इत्यादी कुठल्याही साहित्य प्रकारातील पुस्तकांचा या पुरस्कारासाठी विचार केला जाणार आहे. यासाठी राज्यातील मराठी भाषेतील साहित्यिकांनी आपल्या साहित्यांच्या दोन प्रती २० डिसेंबरपर्यंत पुरस्कार निवड समितीकडे अकलूज ता. माळशिरस जि. सोलापूर येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे पाठवण्याचे आवाहन आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील व स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९४२१०६९५ ६९, ९७६७८९०८७२, ९५०३८०९९२२ या नंबरवर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

---

अकलूज येथे पत्रकार परिषद आयोजित करून ट्रस्टचे कार्याध्यक्ष आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील व पुरस्कार निवड समितीच्या अध्यक्ष स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांनी यासंदर्भात माहिती दिली. यावेळी स्वरुपाराणी मोहिते-पाटील यांनी सांगितले की, 'सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील हे विविधांगी व्यक्तिमत्व होते. राजकारण, समाजसेवा, कला, क्रीडा अशा अनेक क्षेत्रात त्यांनी असामान्य कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. राज्यातील सहकार चळवळीचे ते आधारस्तंभ होते. सहकारी संस्थांच्या माध्यमातून त्यांनी केलेला आर्थिक विकास राज्यात अनेक नेत्यांना प्रेरणादायी ठरला.

सहकार महर्षी यांचे अनेक साहित्यिक, विचारवंत व वक्ते यांच्याशी जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांच्या कार्याची ही परंपरा त्यांचे चिरंजीव व राज्याचे माजी उपमुख्यमंत्री तथा विजय गणेशोत्सव पब्लिक ट्रस्टचे अध्यक्ष विजयसिंह मोहिते-पाटील यांनी सुरू ठेवली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १४ जानेवारी २०२३ पासून आम्ही सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्य पुरस्कार देण्याचा निर्णय घेतला असल्याचे स्वरुपाराणी मोहिते -पाटील यांनी सांगितले.

यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, संचालक नंदिनीदेवी मोहिते-पाटील, सचिव अभयसिंह माने-देशमुख आदि मान्यवर उपस्थित होते.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors / agencies on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following works.

**Tender No:** CE/EHV/CC O&M/Zone/Pune/T-29/2022-23

**RFx No. 7000025408**

**Subject:** E-Tender for Annual Transport Contract for Transportation, Loading, Unloading, Winching, Turning & Clearing, Dismantling & Erection of Power Transformers / ICTs / Reactors, Weights ranging from 20 MT to 180 MT by Standard / Hydraulic Trailers for various EHV Substations under EHV O&M Circle, Solapur. **Tender Amount:** Rs. 75,00,000/- **EMD:** Rs.75,000/- **Tender Fees:** Rs. 500/- + GST **Download Tender Documents:** From 02.12.2022 to 09.12.2022 up to 11:00 Hrs **Bid Opening:** 09.12.2022 after 12:00 Hrs (Tech.); 12.12.2022 after 11:00 Hrs (Price).

For further details, visit our website **https://mahatransco.in** and open **above RFx** for downloading tender documents, schedules and annexures.

**Sd/-**
**Chief Engineer,**
**EHV PC (O&M) Zone, Pune**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

Digitally signed online bids are invited through E-Tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No. 7000025366 E-Tender No.** EE/400kV/R.S/DN/LBT/-Tender:09/2022-2023 **Particulars:** Work of providing & fixing of motorized isolators drive mechanism box type – MT 50 for 220 kV ABB make motorized isolator installed at 400 kV R.S. Division Lamboti. **Estimated Cost:** Rs. 13,22,040/- **E.M.D. (Approx. 1% of Est. Cost):** Rs 13,220/- **Tender Cost:** 500/- + 5% GST i.e. Rs. 525/- **Sale Period:** 01.12.2022 to 09.12.2022 **Last Date of Submission:** 09.12.2022 up to 18:00 Hrs **Date of Opening (Tech. Bid):** 09.12.2022 at 19:00 Hrs (If possible). **Contact Person:** Executive Engineer -7447441034. For further details, please visit to **https://srmetender.mahatransco.in**

**Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**400 kV R.S. Div, Lamboti**

जा.क्र.आरोग्य/१४५५/२०२२
दि. ०२/१२/२०२२

**माढा नगरपंचायत, माढा**

निविदा प्रसिध्दीकरण सुचना क्र.१

माढा नगरपंचायत, २०२२/२३ मधील **नगरपंचायत फंड/स्वच्छ भारत/१५ वा वित्त आयोग अंतर्गत (कामाची संख्या ०१)** हाती घेण्यात आलेल्या विकास कामाची निविदा ब-१ नमुन्यात मागवित आहे. **निविदा व कोरी निविदा संच तसेच अटी व शर्ती नगरपंचायत कार्यालयामध्ये संबंधित विभागाकडे दि. ०३/१२/२०२२ ते ०९/१२/२०२२ पर्यंत उपलब्ध आहेत.**

शिक्का

सही/-
**मुख्याधिकारी,**
माढा नगरपंचायत, माढा



## अशोक पाचकुडवे यांना राज्यस्तरीय सत्यशोधक पुरस्कार कोल्हापूर येथे प्रदान

**मोहोळ** : निर्मिती विचार मंच कोल्हापुर व प्रागतिक लेखक संघ यांच्या वतीने दिला जाणारा मानाचा व प्रतीष्ठेचा राज्य स्तरीय सत्यशोधक पुरास्कार मोहोळ येथील राष्ट्रमाता इंदिरा कन्या प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय मोहोळ येथील जेष्ठ शिक्षक प्रा. अशोक पाचकुडवे याना कोल्हापुर येथे प्रदान करण्यात आला. राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यस्मरण दिना निमित्त कोल्हापुर येथील छत्रपती शाहू महाराज सभागृह येथे सदर संस्थेच्या वतीने पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. प्रा.अशोक पाचकुडवे यांच्या सामाजिक शैक्षणीक व सांस्कृतिक कार्याची दखल घेऊन त्याना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रसिध्द साहित्यीक, विचारवंत व आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष श्रीपाल सबनीस, प्राचार्य डॉ. राजेखान शानेदिवाण, खासदार धैर्यशील माने यांच्याहस्ते गौरवण्यात आले. यावेळी निर्मिती विचारमंच चे प्रमुख प्रा.अनिल म्हमाणे, लेखक प्रा. खंडेराव शिंदे, प्राचार्य डॉ.प्रशांतकुमार कांबळे, प्रा. डॉ.आरुण भोसले, प्रा. सुरेश जाधव, प्रा. डॉ सुरज वाघमारे, प्रा. महादेव निर्मळे, प्रा.आविनाश पाटील आदि मान्यवर साहित्यीक उपस्थित होते. अशोक पाचकुडवे याना यापूर्वी अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष यशवंत गुंड, उपाध्यक्ष संतोष गायकवाड सचिव तथा प्राचार्य सुधीर गायकवाड, चेअरमन रंभादेवी गुंड, शिक्षक आमदार जयंत आसगावकर, बहुजन शिक्षक महासंघाचे प्रदेश अध्यक्ष आण्णासाहेब भालशंकर, भुजंगराव पाचकुडवे, शशिकांत ठोकळे, कुमार ढवळे, नामदेव नरुटे, माजी ए.सी. पी. सिध्देश्वर हजारे यांच्यासह शिक्षक बंधु भगिनी यांनी त्यांचे आभिनंदन केले.



## स्वेरीमध्ये नॅशनल कॉम्प्यूटर 'सेक्युरीटी डे' साजरा

**पंढरपूर** : गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागामध्ये नॅशनल कॉम्प्यूटर सेक्युरीटी डे उत्साहात साजरा करण्यात आला. स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ.स्वाती पवार यांच्या नेतृत्वाखाली आयोजिलेल्या या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बेंगलोर येथील प्रिन्सिपल सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग नेट सेलर बी यु लोड सॉफ्टवेअर ग्रुपचे प्रमुख सौरभ सरदेशमुख यांनी सायबर सेक्युरिटी' या विषयावर मार्गदर्शन केले. सध्याच्या स्पर्धे च्या युगात वेगाने पुढे जात असताना संगणकाबद्दलची माहिती अद्ययावत करणे गरजेचे असून संगणकाच्या वापराने जेवढे फायदे होतात, तेवढेच नुकसान देखील होऊ शकते यासाठी संगणकाची सुरक्षा विचारात घेणे गरजेचे आहे. यावेळी पाहुण्यांनी कोणत्या प्रकारचे ऑनलाइन गैरव्यवहार होऊ शकतात? याची माहिती दिली. बँकिंगचे व्यवहार करताना कोणती काळजी घ्यायची, ओटीपी कसा येतो तसेच आलेल्या लिंकची खात्री करूनच पुढील प्रक्रिया कराव्यात, असे प्रतिपादन केले. ई-मेल आणि इतर सोशल मीडियाचे अकाउंट वापरताना नेमकी काय सुरक्षितता घ्यायची? याबद्दल मार्गदर्शन केले. या वेळी मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ.संदीप वांगीकर यांनी नॅशनल कॉम्प्यूटर 'सेक्युरीटी डे' का साजरा करायचा? याबद्दल बहुमोल मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. एस. एम. शिंदे, प्रा. एस.एस. कदम, आयकॉन'चे समन्वयक प्रा. प्रमोद माने, सह-समन्वयक प्रा.के. आय. चौहान, प्रा. एन.डी.देवल, प्रा. व्ही.व्ही. झांबरे यांच्यासह विभागातील प्राध्यापक उपस्थित होते. प्रा.प्राजक्ता सातारकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून आभार मानले.



## मोडनिंबमध्ये रक्तदानाने शहिदांना आदरांजली

**मोडनिंब** : मोडनिंब येथील मंगलमुर्ती बहुद्देशिय सामाजिक संस्थेच्या वतीने रक्तदान शिबिर आयोजित केले होते. २६ नोव्हेंबर रोजी झालेल्या मुंबई येथील हल्यात शहीद झालेल्या जवानांना व हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आदरांजली म्हणून हे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी एकुण ५४ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवला. याप्रसंगी शिवसेना (उद्दव बाळासाहेब ठाकरे गट) तालुका प्रमुख मधुकर देशमुख, गटप्रमुख दिपक सुर्वे, काँग्रेस तालुकाध्यक्ष सौदागर जाधव, अनिल शिंदे, बालाजी पाटील, रविकांत जाधव, संभाजी तोडकरी, किशोर नाळे, सतिश क्षीरसागर, जयदेव पवार, महादेव गाडे, सुधीर गिडडे, लक्ष्मीकांत खंदारे, अमोल गरधरे, समाधान सुवै, माऊली पवार, सुदर्शन कोळी, नितीन घमे, सुदर्शन कोळी, शिवाजी माळी, सचिन खडके, अनिकेत गुरव आदी उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर Classified

पाहिजेत

● सिक्युरिटी गार्ड पाहिजे (सात रस्ता परिसरात) वयोमर्यादा ५० आणि ड्युटी १२ तास.
संपर्क : 9822252812
7304187878
(121222)

## समता पर्व दिनानिमित्त कार्यशाळा

**सोलापूर** : संविधान दिनापासून ते महा परिनिर्वाण दिनानिमित्त भारती विद्यापीठात युवकांची कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी सहायक आयुक्त कैलास आढे यांनी युवकांनी शासकीय विविध योजनेचा लाभ घ्यावा. समता पर्व निमित्ताने समाजातील सर्व स्तरातील युवक व युवतीसाठी सामाजिक, आर्थिक व कौटुंबिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# गुणवत्तेच्या जोरावर भाजीपाला रोपांचा शिवनेरी ब्रॅण्ड

## भाजीपाला ते फळांच्या दर्जेदार रोपांसाठी खवणीच्या बालाजीची हायटेक रोपवाटिका

सुराज्य/शिवाजी हळणवर

**शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार रोपांचा पुरवठा व्हावा, आणि कोणाची फसवणूक होवू नये असा उद्देश ठेवूनच कमी दर्जाच्या रोप खरेदीच्या प्रसंगामुळे झालेले नुकसान, यातूनच संपूर्ण कुटुंबाच्या पाठबळावर रोपवाटिकेची सुरुवात करून ४० मजूरांना रोजगार निर्माती करीत हायटेक रोपवाटिकेच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार भाजीपाला रोपाचा 'शिवनेरी ब्रॅण्ड 'तयार केला आहे.**

पंढरपूर- मोहोळ महामार्गालगत असणाऱ्या खवणी येथील बालाजी पंडित भोसले या अल्पशिक्षित तरूणांने सुमारे तीन एकरांवर हायटेक पद्धतीने प्रशस्त रोपवाटिका विस्तारली आहे. एका बाजूला पॉलिहाउसमधील हिरवीगार, टवटवीत दर्जेदार टोमॅटो, वांगी, झेंडू, कोबी, हिरवी व सिमला मिरची, फ्लॉवर, काकडी यासारख्या सर्व प्रकारच्या फळभाज्या पासून ते कलिंगड, खरबूज, पपई, जी-९ केळी या फळांची गुणवत्तापुर्ण रोपे आणि दुसऱ्या बाजूला शेतीतले टोमॅटो, झेंडू यांसारख्या शेतीचे प्रयोग, ही जातिवंत शेतकऱ्यांची रोपवाटिका असल्याची जणू जाणीव करून देताना दिसून येते.मुख्यतः मे, जून, जुलै दरम्यान टोमॅटो, हिरवी मिरची, सिमला मिरची, झेंडू, ऑगस्ट ते सप्टेंबरमध्ये मिरची, टोमॅटो तर ऑक्टोबर ते फेब्रुवारीपर्यंत कलिंगड, खरबूज याप्रमाणे त्या त्या हंगामातील रोपे तयार केली जातात. त्यात सर्वप्रकारच्या भाजीपाला रोपांना मागणी असते. पण त्यातही टोमॅटो, कलिंगड, खरबूज, झेंडू इत्यादीच्या रोपांची सर्वाधिक मागणी असते. थेट रोपे बुकिंग करण्यासह स्वतः शेतकऱ्यांनी बी आणून दिले, तर त्यापासून रोप तयार करून देणे, अशा दोन्ही पद्धती ते शेतकऱ्यांना मदत व मार्गदर्शन करतात. त्याशिवाय त्यांच्याकडे संपूर्ण रोपवाटिकेत रोज २० महिला मजूर आणि पाच पुरुष मजूर कामासाठी असतात. तसेच शेतीतल्या अन्य कामांसाठी वेगळे १० ते १५ मजूर त्यांच्याकडे असतात, साधारण ३५ ते ४० मजुरांना रोज त्यांच्याकडे काम उपलब्ध आहे, यातून त्यांनी रोजगारनिर्मिती साधली आहे.

हायटेक पद्धतीने रोपनिर्मिती सुमारे तीन एकरांवर सध्या त्यांच्याकडे रोपवाटिका आहे. त्यात एक एकर उच्च तंत्रज्ञानावर आधारित 'पॉलिहाउस' उभारले आहे. त्याशिवाय एक एकरवर प्रशस्त असे 'हार्डनिंग युनिट' आणि अन्य मोकळ्या जागेवरही विविध प्रकारची रोपे ठेवली जातात. त्यांच्याकडे रोपांची निर्मिती पूर्णपणे ट्रेमध्ये केली जाते.त्यात ट्रेमध्ये बी भरण्यासाठी खास 'सीडलिंग मशिन' आहे. एका दिवसात किमान ४ लाख बियाणे या मशिनद्वारे ट्रेमध्ये भरली जाऊ शकतात, एवढी त्याची क्षमता आहे. रोप व्यवस्थपनामध्ये पॉलिहाउस आणि हार्डनिंग युनिटमध्ये ट्रे खाली खडी आणि त्यावर विशिष्ठ अशी मॅट असल्याने रोपांचे बुरशीजन्य रोगांसह अन्य कीड- रोगांपासूनही संरक्षण होते.

शिवाय खत-पाणी देण्यासाठी एक वेगळी यंत्रणा आहे, ती योग्य पद्धतीने व्यवस्थापन करण्यासाठी वापरली जाते. बिया भरतेवेळी प्रत्येक लॉटला त्या त्या लॉट नंबरनुसार रोपांच्या प्रत्येक ट्रेला स्टीकर लावले जाते, जेणेकरून तो लॉट मिसळू नये, तसेच कोणत्या लॉटचे रोप, कोणत्या शेतकऱ्याला दिले, याची अचूक नोंद ठेवली जाते. संपूर्ण रोपवाटिका सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या कक्षेत आणली आहे. त्याद्वारे संपूर्ण नियंत्रण ते ठेवतात, मजुरांनाही पंचिग मशिनद्वारे हजेरी ठेवली आहे.

### महाराष्ट्रासह आंध्र, तेलंगणातून मागणी

महाराष्ट्रात सोलापूरसह सांगली, कोल्हापूर, पुणे, सातारा, नगर, उस्मानाबाद, लातूर, बीड, परभणी, धुळे, नंदूरबार यांसह कर्नाटकातील विजापूर, गुलबर्गा, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातील काही जिल्ह्यांतून भाजीपाला रोपांना मागणी होते. साधारण त्या, त्या हंगामानुसार शेतकरी रोपांसाठी आधीच आगाऊ बुकिंग करतात. त्यामुळे वर्षभर सातत्याने रोपांचा पुरवठा सुरूच असतो. साधारण वर्षाकाठी एक कोटीपेक्षाही अधिक रोपांची निर्मिती रोपवाटिकेतून होते.



### नव उद्योजकांना प्रोत्साहन, रोजगारनिर्मिती

बालाजी यांनी आज केवळ आपल्यापुरता आणि आपल्या कुटुंबापुरता हा व्यवसाय ठेवला नाही. तर अन्य नव उद्योजकांनाही प्रोत्साहन दिले आहे. जिल्ह्यातील आणि जिल्ह्याबाहेरील जवळपास दहा तरुणांच्या रोपवाटिकांना रोपे पुरवून आणि रोपे कशी तयार करायची, याच प्रशिक्षण देऊन त्यांचा उद्योग त्यांना पुन्हा उभा करून दिला आहे.

कुटुंबाची साथ आणि नवनिर्मीचा ध्यास. वडिलांच्या आकस्मिक निधना नंतर कुटुंबासह व्यवसायाचा भार पडला. आई सुनंदा, भाऊ व कुटुंबातील सर्वांची मोलाची साथ मिळाली आणि आपण शेतकरी आहोत, व्यावसायिक नाही, ही भावना मी कायम मनात ठेवतो, शिवाय मी ज्या परिस्थितीतून आलो, त्याची पूर्णपणे जाणीव मला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा विश्वास मला महत्त्वाचा आहे. रोपांच्या निर्मितीत कोणतीही तडजोड करत नाही. शेतकऱ्यांचा हाच विश्वास मला महत्वाचा वाटतो. रोपांचा दर्जा, गुणवत्ता ठेवल्याने आज शेतकरी विस्वासाने रोपे खरेदी करतात.

**- बालाजी भोसले**
शिवनेरी रोपवाटिका, खवणी, जि. सोलापूर

## 'फतवा' ९ डिसेंबरला चित्रपटगृहात

**सोलापूर** : 'फतवा' हा चित्रपट येत्या ९ डिसेंबरला रुपेरी पडद्यावर येऊ घातला आहे. या चित्रपटातील प्रेमकथेला संगीताची उत्तम साथ देत प्रेमाचा वेगळा पैलू उलगडून दाखविण्याचा प्रयत्न दिग्दर्शक प्रतिक गौतम याने 'फतवा' या संगीतमय प्रेमपटातून केला आहे. ब्ल्यु लाईन फिल्मस् प्रस्तुत या संगीतप्रधान चित्रपटातून प्रतिक गौतम आणि श्रद्धा भगत ही नवी जोडी रुपेरी पडद्यावर येत आहे.

डॉ.यशवंत, प्रेमा निकाळजे, अनुराधा पवार यांनी या चित्रपटाची निर्मीती केली आहे.प्रेमासाठी त्याग, संघर्ष आणि काहींही करायची तयारी असणाऱ्या रवी आणि निया यांच्या आयुष्यात घडणाऱ्या घटनांनंतर त्यांच प्रेम कोणतं वळण घेत? हे वळण त्यांना एकत्र आणणार की वेगळं करणार? हे दाखवतानाच प्रामाणिक प्रयत्न फतवा' चित्रपटातून करण्यात आला आहे. या नव्या जोडीसोबत छाया कदम, मिलिंद शिंदे, नागेश भोसले, संजय खापरे, अमोल चौधरी, निलेश वैरागर, पूनम कांबळे, निखिल निकाळजे, निकिता संजय हे कलाकार 'फतवा' मध्ये दिसणार आहेत. 'फतवा' चित्रपटाची कथा प्रतिक गौतम यांची आहे. छायांकन दिलशाद व्ही. ए. तर संकलन फैजल महाडिक, इमरान महाडिक यांचे आहे. कला योगेश इंगळे तर साहसदृश्य कौशल मोजेस यांची आहेत. रंगभूषा प्रताप बोऱ्हाडे तर वेशभूषा वर्षा यांची आहे. कार्यकारी निर्माते महेश चाबुकस्वार आहेत.

## रॅपिड ॲक्शन फोर्सच्या कर्मचाऱ्यांनी केले पथसंचलन

सुराज्य/पंढरपूर



श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसराची पाहणी करण्यासाठी सीआरपीएफचे असिस्टंट कमांडर (रॅपिड ॲक्शन फोर्स ) चे स्वप्निल पवार हे पंढरपूर येथे आले होते. या दरम्यान त्यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी विक्रम कदम, पोलीस निरीक्षक अरुण फुगे उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले, दोन वर्षातून एकदा आम्ही सिंसेटिव्ह सिटींची पाहणी करतो असतो. आम्ही सोलापूर जिल्ह्यातील अनेक गावांची पाहणी करणार असून त्याची सुरुवात पंढरपूरपासून केली आहे. पंढरपूर शहरातील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर, महाद्वार घाट, गल्ली बोळातील रस्ते, संतपेठ भागाची माहिती घेतली आहे. येथे सतत व्हिआयपी येत असतात. यामुळे हे शहर खूप महत्त्वाचे आहे. यामुळे येथे कोणता अनुचित प्रकार घडलाच तत्काळ मदत मिळावी या दृष्टीने आम्ही पाहणी केली आहे. त्याचबरोबर शहरातील चांगल्या गोष्टींचा गुन्हेगारांची देखील माहिती घेतलेली आहे.

## 'शिवरत्न'चे तीन खेळाडू बास्केटबॉल संघात

**अकलूज** : औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात दि.३ ते ७ डिसेंबर दरम्यान आयोजित केलेल्या चोवीसाव्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धेमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या बास्केटबॉल संघामध्ये येथील शिवरत्न शिक्षण संस्था संचलित शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजच्या ज्योतिरादित्य दानवे, प्रसाद बारवे व शुभम सूळ या तीन खेळाडूंची विद्यापीठ संघात वर्णी लागली आहे.



निवडीबद्दल शिवरत्न शिक्षण संस्थेचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते- पाटील, उपाध्यक्षा शितलदेवी मोहिते -पाटील यांनी खेळाडूंचे अभिनंदन करत स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. संघाचे सराव शिबिर तेवीस नोव्हेंबर पासून अकलूज येथील विजयसिंह क्रीडा संकुलात प्राध्यापक डॉ. महेश ढेंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. ग्रीन फिंगर्स कॉलेज ऑफ कंप्युटर टेक्नॉलॉजी चे उपप्राचार्य व क्रीडा संचालक डॉ.महेश ढेंबरे यांच्या व्यवस्थापनाखाली विद्यापिठाचा संघ औरंगाबादकडे रवाना झाला. सचिव धर्मराज दगडे, संचालक डॉ. विश्वनाथ आवाड, तानाजी काशीद, प्राचार्य डॉ. अरविंद कुंभार, अश्रफ शेख, महाविद्यालय विकास समीतीचे सर्व सदस्य, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी निवड झालेल्या खेळाडूंचे अभिनंदन केले.

## शरद पवारांवर भूंकण्यासाठी पडळकर यांना आमदारकी

**पंढरपूर** : पवार यांच्यावर भुंकण्यासाठी गोपीचंद पडळकर यांना आमदारकी देण्यात आली आहे असा घनाघती आरोप विद्याताई चव्हाण यांनी केला आहे त्या पंढरपूर मध्ये शारदायी पुरस्कार वितरणासाठी आल्या होत्या.चोऱ्या माऱ्या करून मंगळसूत्र चोरून शरद पवार यांच्यावर झोपण्यासाठी आमदार झालेल्या गोपीचंद पडळकर बद्दल काय बोलायचे पडळकर यांना फक्त बारामतीवर टीका करण्या साठी आमदारकी मिळाली आहे. पंढरपूर मधील होळकर वाडा असल्याबद्दल पडळकर यांना माहिती तरी आहे का असा प्रश्न चव्हाण यांनी उपस्थित केला आहे.



## हगलूर येथे प्रवेशद्वाराचे उद्घाटन


सुराज्य/उत्तर सोलापूर

हगलूर येथे माजी आमदार दिलीप माने यांच्या हस्ते माजी उत्तरचे माजी सभापती रजनी संभाजी भडकुंबे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रवेशद्वाराचे उदघाटनासह सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

दुसऱ्यादा सभापती चषकाचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील विविध संघ सहभागी झाले होते. गुळवंची येथील संघ विजेता व वडाळा येथील संघ उपविजेता ठरला हगलूर येथील राजर्षी शाहू नगर मधील प्रवेशद्वार उदघाटन, भीमनगर येथील ग्रामस्थांसाठी शुध्द पाण्यासाठी वॉटर फिल्टरचे उदघाटन करण्यात आले. यावेळी पृथ्वीराज माने युवा मंच तालुकाध्यक्ष सुनील जाधव, माजी उपसभापती संभाजी भडकुंबे, सरपंच अरिफा पठाण, ग्रामसेवक राजकुमार साबळे, अक्कलकोटचे माजी सभापती सिद्धार्थ गायकवाड, राजर्षी शाहू शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अनिल वाघमारे, चेअरमन श्रीशैल रणधीरे, राजू शिंदे, माजी केंद्रप्रमुख भालेराव, श्रीरंग मगर, ग्रामपंचायत सदस्य- शाम शिंदे, युवानेता अमित भडकुंबे, अतुल मस्के, अनिल शिंदे, साहेबराव शिंदे, बबन शिंदे, अभिजित भडकुंबे, अविनाश बनसोडे, शशिकांत गायकवाड, किरण गायकवाड, पाटील जानराव, एस बी प्रतिष्ठानचे कार्यकर्ते सह ग्रामस्थ उपस्थित होते.

## ७ डिसेंबरपासून मैंदर्गीत ग्रामदैवत शिवचलेश्वर महायात्रा महोत्सव

**अक्कलकोट** : दर वर्षाप्रमाणे यंदाही श्री शिवयोगी शिवचलेश्वर महा यात्रा महोत्सव कार्यक्रम दि ७ ते १५ डिसेंबर पर्यंत यात्रा महोत्सव विविध कार्याक्रमाने सादर होणार आहे. बुधवार दि ७ डिसेंबर रोजी रात्री ८.३० वाजता रथोत्सव कार्यक्रम व दि ८ डिसेंबर रोजी रात्री ८ वाजता नयनरम्य शोभेचे दारु काम व दि ९ डिसेंबर रोजी दुपारी ३ ते ६ वाजे पर्यंत जंगी कुस्ती कार्यक्रम संपन्न होईल व दि. ११ डिसेंबर रोजी कळसारोहण संपन्न होत आहे.



दि ७ ते १५ डिसेंबरपर्यंत भव्य जनावर गड्डा भरणार आहे. या जनावर बाजारमध्ये उत्कृष्ट प्रकारचे दुधती गाय, एक नंबर जातीचे खोंड व बैल बाजार भरणार आहे. रोज रात्री कलगीतुरा गायनाचे कार्यक्रम संपन्न होणार आहे.दरम्यान खास मनोरंजनासाठी श्री सिध्दरामेश्वर नाट्य संघ मैंदर्गी यांच्या कडून सुंदर सामाजिक कन्नड नाटक मुर दिनद संते (तीन दिवसाचे बाजार) हा नाटक सादर होणार आहे. तरी शेतकरी बांधवांनी जनावर बाजारास भेट देऊन जनावरे खरेदी करावे व यात्रेस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पंचकमिटीने कळविण्यात आली आहे.

# आजच्या महिलांनी उद्याचे पवार घडवावेत : चव्हाण

## पंढरपुरात पार पडला आदर्शमाता व कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा

सुराज्य/पंढरपूर

परिस्थिती नसतानाही अकरा मुलांना जन्म देऊन त्यांचे योग्य पद्धतीने संगोपन करून त्यांना योग्य शिक्षण देऊन व संस्काराची शिदोरी त्यांच्यासोबत ठेवून ज्या पद्धतीने शारदाबाई पवार यांनी आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेबांसारखा नेता घडवला असेच उद्याचे युवक व सुसंस्कारित पवार साहेबांसारखे युवक घडवावेत असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्ष विद्याताई चव्हाण यांनी केले.

अजित दादा पवार फाउंडेशन व राष्ट्रवादी युवक काँग्रेस यांच्या वतीने शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त सोलापूर जिल्ह्यातील कर्तुत्वान मातांचा शारदाई पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रवक्त्या रूपालीताई ठोंबरे-पाटील युवती प्रदेशाध्यक्ष सक्षणाताई सलगर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते उमेश पाटील शिक्षण प्रसारक मंडळ मंगळवेढा सचिव प्रियदर्शनी ताई महाडिक सुनिताई रोटे लता ताई फुटाणे पंढरपूर शहराध्यक्ष सुधीर भोसले नगरसेवक मोहम्मद उस्ताद विधानसभा अध्यक्ष संदीप मांडवे आदी उपस्थित होते

या कार्यक्रमात सोलापूर जिल्ह्यातील रंजना आवटे (लोकमतचे संपादक संजय आवटे यांच्या मातोश्री), सुवर्णलता रामदास भाजीभाकरे (जिल्हाधिकारी रोहिणी भाजीभाकरे व पोलीस उपायुक्त संदिप भाजीभाकरे यांच्या मातोश्री), कमल गाढवे (मारूती गाढवे यांच्या मातोश्री), विद्या क्षीरसागर (मयुरा



शिंदेकर असिस्टंट डायरेक्टर स्मार्ट सिटी यांच्या मातोश्री), श्रीमती लोकमुद्रा सुरेश पाटील (उमेश पाटील यांच्या मातोश्री), श्रीमती गोपाबाई साबळे (पुण्यनगरीचे संपादक श्रीकांत साबळे यांच्या मातोश्री), मिनाक्षी सुभाष कदम (सुजीत कदम यांच्या मातोश्री), सुनंदा खांडेकर (जिल्हाधिकारी श्रीकांत खांडेकर यांच्या मातोश्री), लक्ष्मी राठोड (पीएसआय विजय राठोड यांच्या मातोश्री), यमुना काळेल (महाराष्ट्र केसरी चंद्रहार निमगिरे यांच्या आत्या), पद्मीनी राऊत (लेखक अनिल राऊत यांच्या मातोश्री) यांच्यासह किर्ती नंदकिशोर भरडिया (वरळी सी लिंक ते गेट ऑफ इंडिया हे समुद्री ३८ कि.मी.अंतर % तास २२ मि.पुर्ण करून विश्वविक्रम केल्याबद्दल), किरण नवगीरे (ता.माळशिरस आंतरराष्ट्रीय क्रिकेट संघात स्थान मिळविल्याबद्दल), सिनेट सदस्य प्रा.डॉ.सुशिलकुमार शिंदे, बजरंग शितोळे, डॉ.समाधान माने, डॉ. आर्यन कांबळे (बी.ओ.एस.), ॲड. उषा पवार, डॉ.अमर कांबळे (आय. क्यू.एसी) व पंढरपूरच्या शितल गुरव हिची क्रिकेट संघात नेट बॉलर म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

युवती प्रदेशाध्यक्ष सक्षणताई सलगर, संदीप मांडवे यांनी मनोगत व्यक्त केले. सध्या सोशल मीडिया मुळे अनेक मुली फसल्या जातात अन चुकीचा रास्ता निवडतात त्यामुळे श्रद्धा सारखे प्रकार देशात घडतात म्हणून युवा समाजप्रबोधनकार वसंत हंकारे यांचे मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले त्यांचे मुलांनो आई वडिलांना समजून घ्या या विषयावर व्याख्यान देत असताना संपूर्ण सभागृहात अश्रू अनावर झालेल्या मुली हायमोकलून अश्रूंना वाट करून देत होत्या. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रदेश संघटक चारुशीला कुलकर्णी नगरसेवक मोहम्मद उस्ताद सुरज पेंडल सुरज कांबळे आकाश सिताफ विकी अभंगराव संतोष बंडगर दादा थिटे कॉलेजचे प्राध्यापक मुळे आधी परिश्रम घेत होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री अंकुश गाजरे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन यांनी मानले.

# दिल्ली, मुंबई, चेन्नईत ईडीचे छापे

## कोट्यवधींची मालमत्ता जप्त

सुराज्य/नवी दिल्ली

**मनी लॉँड्रींग प्रकरणी सक्तवसुली (ईडी) संचालनालयाने शुक्रवारी दिल्ली, मुंबई, चेन्नई येथील १६ ठिकाणी छापे टाकले. छाप्यांमध्ये कोट्यवधी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली.**

सिक्योरक्लाउड टेक लिमिटेड, प्रो फिन कैपिटल सर्विसेज लिमिटेड, क्वॉंटम ग्लोबल सिक्योरिटीज लिमिटेड, यूनिटी ग्लोबल फायनानशिअल सर्विसेज प्राइवेट लिमिटेड, डेजर्ट रिवर कॅपिटल प्राइवेट लिमिटेड व त्यांच्या अधिकाऱ्यांच्या कार्यालयावर छापे टाकण्यात आले. छाप्यांमध्ये १.४ कोटींची रोकड, सोने, हिरे व दागिने जप्त करण्यात आले. काही मालमत्तांचाही खुलासा छाप्यांमध्ये झाला आहे. यावेळी ईडीने विविध डिमॅट खाते, काही कागदपत्रे व डिजिटल कागदपत्रे जप्त केली.

मनी लॉँड्रींग कायद्यातंर्गत तपास करताना ईडीने शेअर दलालांची चौकशी केली. या चौकशीत धकादायक माहिती समोर आली आहे. शेअर व वित्तसेवा कंपन्यांच्या मालकांनी १६० कोटी रुपयांचे शेअर दिशाभूल करुन विकले. याद्वारे त्यांना कोट्यवधी रुपयांचा नफा झाला, असा आरोप आहे.

ईडीचे देशभरात छापेमारी सुरुच असते. भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी ही छापेमारी सुरुच असते. गुरुवारी ईडीने नागपूर येथील सुपारी व्यापाऱ्याकडे छापा टाकला. प्रकाश गोयल, आसिफ कलीवाला, हेमंत कुमार गुलाबचंद, वसीम बावला, दिग्विजय ट्रान्सपोर्टचे हिमांशु भद्रा आदींवर छापे टाकल्याने सुपारी व्यापाऱ्यांचे धाबे दणाणले. यामुळे एकच खळबळ उडाली.

१८ घरे व अन्य ठिकाणांची तपासणी करण्यात आली. सुमारे १३० अधिकाऱ्यांनी ही कारवाई केली. छाप्यात सुपारी व्यवहाराची बेहिशोबी कागदपत्रे मोठ्या प्रमाणात जप्त करण्यात आली. छापेमारी केलेले सर्व व्यापारी विदेशी सुपारी आयात करणारे आहेत. यापूर्वीही ते वेगवेगळ्या तपास यंत्रणांच्या रडारवर होते.




गेल्या काही दिवसांपासून बॉलिवूडही ईडीच्या रडारावर आले आहेत. लोकप्रिय दाक्षिणात्य अभिनेता विजय देवरकोंडा याचीही ईडीकडून चौकशी करण्यात आली. नुकताच त्याचा लायगर चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटासाठी केलेली गुंतवणूक आणि त्याच्या टीमला दिलेल्या पैशांबाबत अभिनेता विजय देवरकोंडाची तब्बल दोन तास ईडी कार्यालयात चौकशी करण्यात आली. त्याआधी चित्रपटाचे दिग्दर्शक पुरी जगन्नाथ आणि अभिनेत्री-निर्माती चार्मी कौर यांचीही चौकशी ईडीने केली.

## अभियंत्यांच्या नियुक्त्यांना उच्च न्यायालयाची स्थगिती

सुराज्य/मुंबई



**सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षण रद्द केल्यानंतर आर्थिक मागास वर्गात समाविष्ट करण्यात आलेल्या राज्य सरकारच्या १११ स्थापत्य अभियंत्यांच्या नियुक्तीला उच्च न्यायालयाने गुरुवारी स्थगिती दिली. विशेष म्हणजे नरिमन पॉईंट येथे गुरुवारी सायंकाळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे आयोजित कार्यक्रमामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या उमेदवारांना नियुक्तीपत्र बहाल करण्यात आले. त्याआधीच त्यांच्या नियुक्तीला उच्च न्यायालयाकडून स्थगिती देण्यात आली. त्यामुळे १११ उमेदवारांना वगळून इतरांना नियुक्तीपत्र देण्याची वेळ शासनावर आली.**

स्थापत्य अभियांत्रिकी सेवांसाठी राज्य लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) एकूण ११४३ उमेदवारांची निवड केली होती. मराठा आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने रद्द केल्यावर ईडब्ल्यूएसमधील आरक्षित जागांवर मराठा समाजातील उमेदवारांना सामावून घेण्याचा निर्णय एमपीएससीने घेतला. त्या निर्णयाला विशेषत: १११ जणांच्या नियुक्त्यांना ईडब्ल्यूएसमधील उमेदवारांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणासमोर (मॅट) आव्हान दिले होते. न्यायाधिकरणाने प्रकरण अंतिम सुनावणीसाठी ठेवताना उमेदवारांच्या नियुक्त्या करण्याची मुभा दिली होती. परंतु नियुक्ती अंतिम निकालाच्या अधीन असल्याचेही न्यायाधिकरणाने स्पष्ट केले होते.

## वंदे भारत एक्स्प्रेसचा पुन्हा अपघात



सुराज्य/नवी दिल्ली

गुजरातमधील गांधीनगर ते मुंबई या मार्गावर प्रवास करणारी वंदे भारत एक्स्प्रेस पुन्हा एकदा जनावरांना धडकली आहे. उदवाडा आणि वापी रेल्वेस्थानकदारम्यान ही घटना घडली आहे. या अपघातात 'वंदे भारत एक्स्प्रेस'च्या समोरच्या काही भागांचे नुकसान झाले आहे.

वंदे भारत एक्स्प्रेसच्या अपघाताची ही चौथी वेळ आहे. गुरुवारी (१ डिसेंबर) संध्याकाळी ही घटना घडली.

**नेमके काय घडले?**

पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी सुमित ठाकूर यांनी या घटनेबाबत सविस्तर माहिती दिली आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार उदवाडा-वापी या रेल्वेस्थानकांदरम्यान गेट क्रमांक ८७ जवळ हा अपघात घडला. अपघातात कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र, यामध्ये वंदे भारत एक्स्प्रेसच्या समोरच्या भागाचे नुकसान झाले. संध्याकाळी ६.२३ वाजता ही घटना घडली. या घटनेनंतर काही कालावधीसाठी रेल्वे थांबवण्यात आली होती.

## राज्यातील शिक्षण संस्थांमध्ये मल्टिपल एन्ट्री-एक्झिटचा पर्याय

### येत्या शैक्षणिक वर्षापासून अंमलबजावणी



सुराज्य/मुंबई

एखाद्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतल्यानंतर ठराविक वर्षे अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर मिळणाऱ्या पदवीच्या रचनेत आता लवचिकता येणार असून व्यावसायिक अभ्यासक्रमांप्रमाणेच पारंपरिक अभ्यासक्रमांमध्येही कोणत्याही वर्षी अभ्यासक्रम सोडणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी अवगत केलेल्या कौशल्यानुसार प्रमाणपत्र मिळणार आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरणातील या तरतुदीची अंमलबजावणी येत्या शैक्षणिक वर्षापासून सुरू होणार आहे. राज्यातील २३१ संस्थांनी ही नवी रचना स्विकारली आहे.

सध्याच्या रचनेत प्रमाणपत्र, पदविका, पदवी असे शैक्षणिक टप्पे गाठणाऱ्या विद्यार्थ्यांना ठराविक काळ प्रत्येक टप्प्यासाठी द्यावा लागतो. मात्र, आता एखाद्या पदवीचे शिक्षण घेताना कोणत्याही टप्प्यावर अभ्यासक्रम सोडावा लागल्यास विद्यार्थ्यांनी घेतलेले शिक्षण वाया जाणार नाही.

विद्यार्थ्यांना अवगत केलेल्या कौशल्यानुसार विद्यार्थ्यांना श्रेयांक आणि अनुषंगाने प्रमाणपत्र मिळू शकेल. त्यानुसार विद्यार्थ्याला रोजगाराच्या संधीही मिळू शकतील. राष्ट्रीय शिक्षण धोरणात कोणत्याही टप्प्यावर अभ्यासक्रम सोडण्याची किंवा अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्याची मुभा देण्यात आली आहे. धोरणातील या तरतूद या शैक्षणिक वर्षापासून (जून २०२३) राज्यात अंमलात येणार आहे.


राज्यातील १२ विद्यापीठातील २३१ शिक्षणसंस्थांनी या नव्या रचनेला मान्यता दिली आहे.

या तरतुदीच्या अनुषंगाने श्रेयांक प्रणालीची अंमलबजावणी, श्रेयांक बँक, चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम या तरतुदींची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी गुरूवारी माध्यमांना याबाबत माहिती दिली.

## स्मृतिभ्रंश आजार बरा करणारे औषध शोधण्यात यश

वृद्धांना मोठा दिलासा

सुराज्य/मुंबई



**वृद्धापकाळात अनेकांना स्मृतिभ्रंशाला सामोरे जावे लागते. हा आजार बरा करण्यासाठी कोणतेही औषध नसल्याने अनेकांच्या दृष्टीने वृद्धापकाळ मोठा त्रासदायक होतो. मात्र, आता प्रभावी औषध शोधण्यात यश आले असल्याचा दावा संशोधकांनी केला आहे. 'लेकेनेमॅब' असे या औषधाचे नाव असून, त्यामुळे हा आजार बरा होणार आहे.**

स्मृतिभ्रंश ग्रस्त नागरिकांच्या मेंदूमध्ये एक प्रकारचा चिकट द्रव म्हणजेच बीटा 'ॲमिलॉईड' तयार होत असते. यावर 'लेकेनेमॅब' हे औषध हल्ला करते. ते मेंदूतील 'ॲमिलाईड' काढून टाकण्याच्या दृष्टिकोनातून बनवण्यात आलेले आहे.

ॲमिलाईड हे प्रथिनांचा एक प्रकार असून, ते मेंदूतील 'न्यूरॉन्स'मधील मोकळ्या जागेत जमा होते. हे एक स्मृतिभ्रंशचे लक्षण आहे.

## माजी मुख्यमंत्री जोशी कोणत्या गटात?

सुराज्य/मुंबई: 'मी पहिल्यापासून आतापर्यंत शिवसेनेत आहे, मी उद्धव ठाकरे यांच्यासोबत सातत्याने उभा आहे, असे माजी मुख्यमंत्री आणि ज्येष्ठ नेते मनोहर जोशी यांनी स्पष्ट केलं. वाढदिवसाच्या निमित्ताने कार्यकर्त्यांनी मनोहर जोशी सरांची भेट घेतली. यावेळी संवाद साधताना त्यांनी ठाकरे गटात असल्याचे स्पष्ट केले.

**मनोहर जोशी काय म्हणाले?**

माझे रक्त शिवसेनेचे आहे. आधी शिवसेनाप्रमुख हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा सहवास, नंतर उद्धवजींचा सहवास, मी महाराष्ट्र, शिवसेनेसाठी आहे. शिवसेना ही संघटना महाराष्ट्रावर अतोनात प्रेम करते. बाळासाहेबांच्या अपेक्षा मी पूर्ण करु शकलो याचे समाधान असल्याचे मनोहर जोशी 'टीव्ही९ मराठी'शी बोलताना म्हणाले.

मी उद्धव ठाकरेंसोबत सातत्याने उभा आहे. मी पहिल्यापासून आतापर्यंत शिवसेनेतच आहे, असे मनोहर जोशी यांनी स्पष्ट केले. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील 'बाळासाहेबांची शिवसेना' पक्षात जोशी जाणार असल्याच्या चर्चांना फुलस्टॉप मिळाला आहे. जोशी हे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) या पक्षात असल्याचे स्पष्ट झाले.

## शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ; प्रस्ताव मंजुरीसाठी वित्त विभागाकडे

सुराज्य/मुंबई



**तुटपुंज्या मानधनावर काम करणाऱ्या शिक्षण सेवकांसाठी आनंदाची बातमी आहे. राज्याच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने तयार केलेला मानधन वाढीचा प्रस्ताव सध्या वित्त विभागाकडे मंजुरीसाठी आहे. या मंजुरीनंतर मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात येईल. त्यानुसार प्राथमिक, उच्च प्राथमिक स्तरावर शिकवणाऱ्या शिक्षण सेवकांना १६ हजार, माध्यमिक पातळीवर १८ हजार तर, उच्च माध्यमिक पातळीवर २० हजार इतके मिळणार आहे.**

शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ व्हावी, यासाठी शिक्षक संघटना तसेच शिक्षण सेवक यांच्याकडून वेळोवेळी मागणी केली जात होती. लोकप्रतिनिधींनी अनेक वेळा मानधन वाढीचा मुद्दा विधिमंडळात चर्चेला आणला होता.

उच्च न्यायालयानेदेखील एका निवाड्यात निकाल देताना शिक्षण सेवकांच्या अल्पशा मानधनाविषयी आश्चर्य व्यक्त केले होते. शिक्षक संघटनांनी मानधनवाढीची मागणी करताना प्राथमिक, उच्च प्राथमिकसाठी २० हजार, माध्यमिकसाठी २५ हजार तर उच्च माध्यमिकसाठी ३० हजार रूपये इतकी मागणी केली होती.

सध्या प्राथमिक (पहिली ते पाचवी), तसेच उच्च प्राथमिकसाठी केवळ ६ हजार, माध्यमिकसाठी (सहावी ते आठवी) ८ हजार तर उच्च माध्यमिकसाठी (अकरावी ते बारावी) ९ हजार एवढे कमी मानधन मिळते. याचा विचार करून या मानधनात वाढ करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. राज्यात सध्या शिक्षण सेवकांची संख्या १२ हजारांच्या आसपास आहे. तर ४० हजार पदे रिक्त आहेत.

### नेट बंद पाडण्यासाठी केबल्स कापल्या

सुराज्य/मुंबई : रिलायन्स जिओच्या जवळपास अडीच हजार ग्राहकांना सबवेंडरच्या नाराज कर्मचाऱ्यांमुळे फटका बसला. कर्मचाऱ्याने ऑप्टिकल फायबर केबल्स कापल्याने दोन दिवस इंटरनेट आणि टेलिव्हिजन केबल कनेक्टिव्हिटी बंद पडली होती. त्याच्याविरुद्ध गोरेगाव पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

रिलायन्स जिओने या मुद्द्यावर कोणतेही अधिकृत निवेदन जारी केलेले नाही. मात्र, रिलायन्स जिओच्या वेंडरचे वरिष्ठ तंत्रज्ञ राजेंद्र मोहिते यांच्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी एफआयआर नोंदवला आहे. हा विक्रेता गोरेगाव-दहिसर पट्ट्यात सुमारे सात वर्षांपासून फायबर केबलच्या देखभालीचे काम करत होता.

### पुण्यात आढळला झिका विषाणूचा रुग्ण

सुराज्य/पुणे : पुणे शहरात झिका विषाणूचा रुग्ण आढळला आहे. रुग्णावर पुण्याच्या खासगी रुग्णालयात उपचार सूरू आहेत. मूळचा नाशिक येथील हा रुग्ण पुण्यात आला होता. ऑक्टोबर महिन्यात तो सुरतला गेल्याची नोंद करण्यात आली आहे. झिकाचा रुग्ण सापडल्याने पुणे महापालिकेची महापालिकेची आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे.

### प्रदूषण ७० टक्के; नियंत्रण शून्य टक्के!

सुराज्य/औरंगाबाद : एकूण प्रदूषणामध्ये शहरातील हवेचे प्रदूषण हे ७० टक्क्यांच्या घरात गेल्याचे एका अभ्यासात दिसून आले असताना, उपाययोजना मात्र कोणत्याच होत नसल्याचे पुरेसे स्पष्ट झाले आहे. त्यातच जागोजागी कचरा जाळण्याच्या 'नवसंस्कृती'ने प्रश्न आणखी गंभीर होत आहे. पुन्हा नवीन झाडे लावणे सोडाच, जुनी शेकडो झाडे तोडण्यात आल्याचेही अलिकडे समोर आले आहे.

परिणामी चंद्रपूर, दिल्लीनंतर औरंगाबादचा समावेश प्रदूषित शहरांमध्ये होतो की काय, अशी भीती अभ्यासक्रमांमधून राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिनानिमित्त व्यक्त केली जात आहे. मागच्या काही वर्षांत वाहनांची संख्या अफाट वाढली आहे व झाडांची संख्या कमी-कमी होत आहे, त्यावरुन हवेचे प्रदूषण ६५ ते ७० टक्क्यांच्या घरात असण्याची शक्यता डॉ. यार्दी यांनी केली.

## अनुदानित शाळांमध्ये शिक्षकांच्या बदलीला स्थगिती

### शिक्षणाधिकारी, उपसंचालकांनी वैयक्तिक मान्यता दिल्यास शिस्तभंगाची कारवाई

सुराज्य/मुंबई

**राज्यातील विना अनुदानित किंवा अंशत: अनुदानित शाळा किंवा तुकडीतून अंशत: अनुदानित किंवा पूर्णत: अनुदानित शाळा किंवा तुकडीतील रिक्त पदांवर बदली करण्यास स्थगिती देण्यात आली आहे. शासनाच्या नियमांचे पालन न करता बदल्या करून वेतन देण्याबाबत अनियमितता झाल्याचे निदर्शनास आल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे, या स्थगितीनंतरही शिक्षणाधिकारी, विभागीय उपसंचालकांनी वैयक्तिक मान्यता दिल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा स्पष्ट इशारा देण्यात आला.**

राज्यातील शाळांतील शिक्षक, शिक्षकेतर पदभरतीवर बंदी असतानाच्या काळात ८ जून २०२०च्या अधिसूचनेद्वारे मूळ नियमावलीत उपनियम समाविष्ट करून त्या अनुषंगाने १ एप्रिल २०२१ रोजी शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला. त्यात शिक्षक अतिरिक्त नसल्याची खात्री करणे, सेवाज्येष्ठतेचे पालन, विषयाची गरज, बदलीपूर्वी शिक्षकाच्या नियुक्तीस मान्यता दिलेली असणे, रिक्त पदावरच बदली करणे अशा तरतुदींचे पालन करणे आवश्यक असल्याचे नमूद आहे. मात्र, या तरतुदींचे पालन न करता विनाअनुदानित किंवा अंशत: अनुदानित शाळा किंवा तुकडीतून अंशत: अनुदानित किंवा पूर्णत: अनुदानित शाळा किंवा तुकडीतील रिक्त पदांवर बदली करून संबंधित शिक्षकांना शासनाच्या शंभर टक्के अनुदानित पदाचे वेतन देण्यात आल्याचे प्रकार शासनाच्या निदर्शनास आला. या पार्श्वभूमीवर परिपत्रकाद्वारे अशा बदल्यांना स्थगिती देण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले.



राज्यातील सर्व जिल्ह्यातील शिक्षकांच्या बदलीबाबत २०२०ची अधिसूचना आणि २०२१च्या शासन निर्णयातील तरतुदींचे पालन झाले आहे किंवा नाही. पदभरती बंदीच्या काळात बदली झाली आहे किंवा कसे, याबाबत शहानिशा करून त्याबाबतचा सविस्तर अहवाल तीन महिन्याच्या आत सादर करण्याचा आदेश शिक्षण आयुक्तांना देण्यात आला आहे.

### खाण दुर्घटनेत ७ जणांचा मृत्यू, काही जण अडकल्याची भीती

सुराज्य/रायपूर : छत्तीसगडमध्ये एक मोठी दुर्घटना घडली आहे. जगदलपूर येथून ११ किलोमीटर अंतरावर मालगावमध्ये खाणीत ही दुर्घटना घडली आहे. खाण खचल्याने १२ जण अडकले असल्याची प्राथमिक माहिती असून यामध्ये ७ जणांचा मृत्यू झाला आहे.

घटनेची माहिती मिळतास स्थानिक प्रशासन, पोलीस दल तातडीने घटनास्थळी दाखल झाले. प्रशासनाकडून बचावकार्य सुरु करण्यात आले मात्र, ज्या सात जणांना बाहेर काढण्यात आले, त्या सर्वांचा मृत्यू झाला होता.

## देशात बेरोजगारीचा उच्चांक

सुराज्य/नवी दिल्ली

कोरोनानंतर देशासमोर उभ्या थकलेल्या अनेक समस्यांपैकी एक म्हणजे बेरोजगारी. कोरोनाचा जोर ओसरून अजूनही देशात रोजगाराची स्थिती सुधारलेली दिसत नाही. 'सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकोनॉमी'ने (सीएमआयई) ने गुरुवारी जाहीर झालेल्या आकडेवारीनुसार नोव्हेंबरमध्ये देशात बेरोजगारी दर ८ टक्के नोंदविण्यात आला आहे. ऑक्टोबरच्या तुलनेत देशातील बेरोजगारीच्या ७.७७ टक्क्यांच्या तुलनेत आणखी वाढ झाली आहे. मागील तीन महिन्यातील आकडेवारी पाहता बेरोजगारीच्या देशाने उच्चांक गाठला आहे.

दरम्यान, मागील वर्षभरातील आकडेवारी पाहायला गेल्यास ऑगस्ट २०२२ मध्येदेशातील बेरोजगारीची टक्केवारी यंदाची सर्वाधिक म्हणजेच ८.२८ इतकी नोंदवण्यात आली होती मात्र मागील दोंन महिन्यापासून हा टक्का खाली आला होता. मात्र, नोव्हेंबर महिन्यात पुन्हा एकदा बेरोजगारीच्या टक्केवारीत वाढ झाली आहे.

### देशातील प्रमुख शहरात परिस्थिती बिकट

'सेंटर फॉर मॉनिटिरग इंडियन इकोनॉमी'ने (सीएमआयई) ही आकडेवारी जाहीर केली आहे. त्यानुसार शहरी भागात बेरोजगारी अधिक असल्याचे स्पष्ट झाले आहे. शहरांमध्ये बेरोजगारीचा दर ८.९६ टक्के, तर ग्रामीण भागात ७.५५ टक्के आहे. ऑक्टोबरमध्ये हा दर अनुक्रमे ८.०४ टक्के आणि ७.२१ टक्के होता.




### सर्वाधिक व सर्वात कमी बेरोजगारी असणारी राज्ये

हरियाणा राज्यात बेरोजगारीचे प्रमाण सर्वाधिक ३०.६ टक्के इतके नोंदवण्यात आले आहे तर टॉप ५ राज्यांमध्ये म्हणजेच राजस्थान (२४.५ टक्के), जम्मू-काश्मीर (२३.९ टक्के), बिहार (१७.३ टक्के) आणि त्रिपुरा (१४.५ टक्के) ही सर्वात खराब कामगिरी करणारी राज्ये ठरली आहेत. यापाठोपाठ मेघालय (२.१ टक्के), कर्नाटक (१.८ टक्के), ओडिशा (१.६ टक्के), उत्तराखंड (१.२ टक्के) तर सर्वात कमी बेरोजगारीचा आकडा हा छत्तीसगढ (०.१ टक्का) मध्ये पाहायला मिळत आहे.

### महाराष्ट्राची आकडेवारी काय सांगते?

सीएमआयईच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्राचा बेरोजगारी दर नोव्हेंबरमध्ये ३.५ टक्के नोंदवण्यात आला आहे. याआधीच्या दोन महिन्यांमध्ये महाराष्ट्रात अनुक्रमे ४ टक्के आणि ४.२ टक्के बेरोजगारीचा दर होता. राज्याच्या शहरी भागांमध्ये बेरोजगारी दर ४.८ टक्के आणि ग्रामीण भागात २.८ टक्के असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# आधार कार्ड अद्ययावत करा, अन्यथा लाभ मिळणार नाही

**निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांचे आवाहन**

**सोलापूर** : केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचे लाभ मिळविण्यासाठी आधार कार्ड अद्ययावत असणे आवश्यक आहे. आधार कार्ड अद्ययावत नसेल तर शासनाचे मिळत असलेले लाभ रद्द होतील तसेच भविष्यात कोणतेही लाभ मिळणार नाहीत. ज्या नागरिकांना आधार कार्ड काढून १० वर्षे पूर्ण झाली आहेत, अशा नागरिकांनी आधार कार्ड अद्ययावत करण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी केले आहे.



गेल्या काही वर्षापासून ओळखीचा पुरावा म्हणून आधार कार्डाला महत्व प्राप्त झाले आहे. त्याअनुषंगाने सर्व नागरिकांना आधार कार्ड नोंदणी करणे तसेच ज्या नागरिकांनी यापूर्वी आधार कार्ड काढलेले आहे व त्याला १० वर्षे पूर्ण झाली असतील अशा आधारकार्डधारक नागरिकांनी आपले आधार कार्ड अद्ययावत करणे आवश्यक आहे. आधार कार्ड योजना सुरु झाली तेव्हा आधार कार्ड काढताना ज्यांनी कोणतीही कागदपत्रे दिली नाहीत, त्यांना आता आधारमध्ये असलेले आपले नाव, पत्ता, जन्मतारीख, वय, लिंग, मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी आदी अद्ययावत करावे लागेल. तसेच डोळयांची बुबुळे, बोटांचे ठसे, चेहऱ्याचे सुधारित छायाचित्र द्यावे लागणार आहे. आधार कार्ड काढल्यानंतर दर ५ ते १० वर्षांनी आधार अद्ययावत करावे लागते. विशेषतः घराचा पत्ता बदललेला असेल तर किंवा लहान मुलांचे आधार कार्ड काढल्यानंतर त्यांना पाच वर्षांनी अपडेट करणे आवश्यक आहे. बोटांचे ठसे, चेहऱ्याचे छायाचित्र, बदललेला मोबाईल क्रमांक आदींमध्ये बदल करता येतो. भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाने मुलांच्या आधार कार्डाबाबत मार्गदर्शक तत्वे जारी केली आहेत.

प्राधिकरणाने जारी केलेल्या नवीन मार्गदर्शक तत्वांनुसार ५ ते १५ वर्षे वयोगटातील मुलांच्या आधार डेटामध्ये बायोमेट्रीक तपशील अपडेट करणे बंधनकारक आहे आणि तसे करण्याची प्रक्रिया निःशुल्क आहे. यासाठी जन्म प्रमाणपत्र, गुणपत्रिका, ओळखीचा पुरावा, मतदार ओळखपत्र, पॅन कार्ड, वाहन चालक परवाना, पासपोर्ट यापैकी कोणतेही एक वैध ओळखपत्र आवश्यक आहे.

# ग्रामपंचायत निवडणूक : सरपंचपदासाठी १०६८ तर सदस्यांकरिता ५८७९ अर्ज दाखल

**सुराज्य/सोलापूर**

**ग्रामपंचायत निवडणूक साठी अर्ज दाखल करण्याच्या शेवट्या दिवशी ऑनलाईन आणि ऑफलाईन असे एका दिवसात सदस्यासाठी ३ हजार ५७२ तर सरपंचपदासाठी ६०८ अर्ज दाखल झाले आता पर्यंत सदस्य पदासाठी ५ हजार ८७९ तर सरपंच पदासाठी १ हजार ६८ उमेदवारी अर्ज दाखल झाल्याची माहिती माहिती निवडणूक शाखेचे विठ्ठल उदमले यांनी दिली.**




| तालुकानिहाय दाखल अर्ज | | |
|---|---|---|
| गाव | सरपंच | उपसरपंच |
| करमाळा | १३५ | ६२५ |
| माढा | २६ | ३१२ |
| बार्शी | ११० | ४८२ |
| उत्तर सोलापूर | ७९ | ४७० |
| मोहोळ | ५७ | २८५ |
| पंढरपुर | ६१ | ४२३ |
| माळशिरस | १९८ | १३०२ |
| सांगोला | ४५ | २६५ |
| मंगळवेढा | ११८ | ६२६ |
| दक्षिण सोलापूर | १२१ | ६३७ |
| अक्कलकोट | १०९ | ४५२ |
| एकूण | १०६८ | ५८७९ |

सोलापूर जिल्ह्यातील १८९ ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी शुक्रवारी २ डिसेंबर रोजी अर्ज दाखल करण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. अनेक उमेदवारांनी मोठे शक्तिप्रदर्शन करत आपले उमेदवारी अर्ज दाखल केले वाजत गाजत गाड्याचा ताफा घेऊन आपल्य समर्थकांसह गटा गटा येवून उमेदवारी अर्ज दाखल केले. १८९ ग्रामपंचायती मधिल ६४६ प्रभागामध्ये सदस्यसाठी आतापर्यंत ५ हजार ८७९ तर सरपंच पदासाठी १ हजार ६८ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. ऑनलाईनचे अर्ज दाखल करण्यास अडचणी निर्माण झाल्याने उमेदवारांना अर्ज दाखल करण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत होता. तक्रारी वाढल्यापासून गुरूवारपासून ऑफलाईन अर्ज स्विकारण्यात आले तर शेवटा दिवस असल्याने वेळ वाढवण्यात आल्याने उमेदवाराची अर्ज भरण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. शुक्रवारी शेवट्या दिवशी सरपंच पदासाठी ६०८ तर सदस्यांसाठी ३५७२ अर्ज दाखल झाले शहर उत्तर व शहर दक्षिण कार्यालयात भरण्यास गर्दी झाली होती. ५ डिसेंबर रोजी दाखल अर्ज छाननी होणार आहे तर ७ डिसेंबर रोजी अर्ज मागे घेण्याची वेळ दुपार तीन वाजेपर्यंत मुदत आहे. त्यानंतर निवडणूकीचे अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे. १८ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुप गावच्या ग्रामपंचायत सरपंच पदासाठी मीनाक्षी टेळे यांनी नार्टकोट प्रशालेत येत उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करताना टेळे यांनी बाऊन्सर सोबत घेऊन मोठे शक्तीप्रदर्शन करत अर्ज दाखल करत लक्ष वेधले.

# काळेंना धक्का, सिताराम साखर कारखान्याच्या गुंतवणूकदारांचे पैसे देण्याचे आदेश

**पंढरपूर** : पंढरपूर तालुक्यातील खर्डी येथील संत सिताराम महाराज साखर कारखाना उभारणीसाठी गुंतवणूकदारांकडून घेतलेले १७ कोटी रुपये आणि त्यावरील पंधरा टक्के व्याज ५ जानेवारी २०२३ पर्यंत गुंतवणूकदारांना देण्याचे आदेश सेबी ने दिले आहेत, अशी माहिती तक्रारदार दीपक पवार यांनी दिली आहे . त्यामुळे पंढरपुरात मोठी खळबळ उडाली आहे.




सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीपूर्वी हा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते कल्याणराव काळे यांना मोठा धक्का मानला जात आहे. कल्याणराव काळे यांचा थेट सिताराम कारखान्याची संबंध नसला तरी त्यांचे अप्रत्यक्षरीत्या कारखान्यामध्ये संबंध आहे. त्यांचे कुटुंबातील सदस्य तसेच नातेवाईक या कारखान्यांमध्ये संचालक आहेत. सेबीने दिलेल्या आदेशामुळे सध्या सिताराम महाराज साखर कारखाना चालवणारे काळुंगे यांना हा झटका मानला जात आहे. गेल्या वर्षीपासून या कारखान्याचे कामकाज काळुंगे पाहत आहेत.गेल्या वर्षभरापासून दीपक पवार गुंतवणूकदारांचे पैसे देण्यासाठी लढा देत आहेत. त्यांनी सीबी, ईडी, इन्कम टॅक्स येथे तक्रारी केले आहेत. यामध्ये सेबीने गुंतवणूकदारांचे १७ कोटी रुपये आणि त्यावरील १५ टक्के व्याज गुंतवणूकदारांना देण्याचे आदेश दिले आहेत.

# सरकारने जनतेच्या भावना समजून घ्याव्यात : आ.पाटील

**सोलापूर** : राज्य कोणते का असेना तेथे कार्यरत असलेल्या शासनाने त्या त्या भागातील जनतेच्या भावना समजावून घेऊन विकास करावा. असुविधा जाणवू नये, याची दक्षता घ्यावी. मूलभूत सुविधा देऊन जनतेचे मन जिंकावे आणि विकासाचे एक आदर्श मॉडेल जगासमोर ठेवावे, अशी अपेक्षा इंडीचे (कर्नाटक) आ. यशवंतगौडा पाटील यांनी व्यक्त केली.



प्रांत, भाषा, सीमावाद या पार्श्वभूमीवर गदारोळ सुरू असताना खासगी कार्यक्रमानिमित्त सोलापूर दौऱ्यावर ते आले होते, यावेळी ते बोलत होते. विकास एका दिवसात होणे शक्य नाही, त्यासाठी नियोजन, सगळ्यांचा सहभाग महत्त्वाचा असून त्या त्या भागातील नागरिकांच्या मानसिकतेबरोबरच अधिकारी आणि लोकप्रतिनिधींची भावना, तळमळही महत्त्वाचे असल्याचे आ.यशवंतगौडा पाटील यांनी सांगितले. यावेळी कन्नड साहित्य परिषद महाराष्ट्र घटकाचे अध्यक्ष सोमशेखर जमशेट्टी, कर्नाटक रक्षणा वेदिकेचे जिल्हाध्यक्ष मल्लिनाथ करपे, सामाजिक कार्यकर्ते शिवसिद्ध बुळ्ळा यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.


**टाकळीतून इंडीला २४ तास उच्च दाबाने पाणीपुरवठा**

सोलापूर महानगरपालिका हद्दीला ज्या टाकळी (ता. द. सोलापूर) परिसरातून पाणीपुरवठा केला जातो, त्याच टाकळीतून नियोजनबद्धपणे इंडीला २४ तास उच्च दाबाने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. इंडीतील घराच्या तिसऱ्या मजल्यावरसुद्धा मोटर न लावता पाणी पोहोचते. हे नियोजनामुळे शक्य झाल्याचे आ. यशवंतगौडा पाटील यांनी सांगितले.

# काशिबा महाराज मठात गुरव समाजाची बैठक

**सुराज्य/सोलापूर**

राष्ट्रीय गुरव समाज महासंघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ११ रोजी सोलापूर येथे संपन्न होणाऱ्या महाधिवेशनाच्या पूर्वतयारीस साठी पंढरपूर येथे काशिबा महाराज मठामध्ये निवडक लोकांची बैठक संपन्न झाली. या बैठकीत पंढरपूर तालुक्यातून सर्व गावोगावी अधिवेशनाचा प्रचार करण्यासाठी एक समिती घटना करण्यात आली.



ही समिती पंढरपूरचे प्रत्येक गावाला भेट देऊन अधिवेशनाचे महत्त्व आणि उपस्थित राहण्याची विनंती करणार आहे.संपूर्ण महाराष्ट्रातून येणारे गुरव बांधव पंढरपूर येथे मुक्कामास येणार आहेत. पंढरपुरात मुक्काम करणाऱ्या गुरव समाज बांधवांचे व्यवस्था करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आलेली आहे. पंढरपूर तालुक्यातून पाच हजारांहून अधिक लोक मेळाव्याला उपस्थित राहणार आहेत, असे विचार पंढरपूर तालुक्याचे मुख्य नेते दिलीप गुरव यांनी सांगितले. यावेळी सदस्य चंद्रकांत गुरव, रोहित शिरुरे, राजेंद्र पुजारी, वकील माऊली महाराज, दादासाहेब गुरव, शांतिनाथ गुरव आदी उपस्थित होते.

# जिल्हा आरोग्य विभाग गोवरबाबत ॲलर्ट

**सीईओ दिलीप स्वामी यांची माहिती**

**सुराज्य/सोलापूर**

राज्यात मुंबई शहर तसेच काही जिल्ह्यामध्ये गोवर विषाणूचा संसर्ग वाढत आहे. त्यामुळे सोलापूर जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग अलर्ट झाला आहे. याबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरु झाल्या आहेत, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शितलकुमार जाधव यांनी दिली.





शुक्रवारी दुपारी आयोजित जिल्हा कृतिदल आढावा बैठकीमध्ये जागतिक आरोग्य संघटनेचे प्रतिनिधींच्या प्रमुख उपस्थितीमध्ये तसेच जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदिप ढेले, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सोनिया बागडे, जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. अनिरुध्द पिंपळे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी तालुका आरोग्य अधिकारी व जिल्हास्तरीय कर्मचारी उपस्थित होते.

जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे व घाबरुन न जाता गोवर टाळण्यासाठी गोवर लसीकरणाचे दोन्ही डोस पूर्ण करणे, जिल्ह्यातील उसतोड मजूर, वीटभट्टी कामगार, वाड्या - वस्त्या , अतिजोखमीच्या गावांतील भागांमध्ये संशयित रुग्णाचे शोध घेणे आदी सूचना स्वामी यांनी दिल्या. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी याबाबत वारंवार आढावा घेतला आहे. तसेच ते पाठपुरावादेखील करत आहेत. काही तालुक्यांचे रिपोर्टिंग प्रलंबित आहे त्यांनी तात्काळ रिपोर्टिंग अद्ययावत करण्याची कार्यवाही पूर्ण करावी, असेही ते म्हणाले.

**काय काळजी घ्यावी ? :** बालकांना डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार अ जीवनसत्व द्यावे, नियमित लसीकरण करावे, गोवर संशयित रुग्णांच्या संपर्कात जाणे टाळावे. वारंवार हात साबणाने स्वच्छ धुवावेत, पिवळी फळे, हिरव्या पालेभाज्या खाणे आवश्यक,

**घाबरून न जाता उपचार घ्या :** वेळेवर लसीकरण केल्यास गोवर रोग टाळता येतो, सर्व खाजगी वैद्यकीय व्यवसायिक यांनी संशयित गोवर रुग्ण आढळून आल्यास त्वरित जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, आजाराला घाबरुन न जाता, वरील जागतिक आरोग्य संघटनेच्या सुचनांचे तंतोतंत पालन करुन सहकार्य करावे असे, आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे.

# डॉ. कोटणीस यांच्या स्मृतिदिनानिमित्त विविध कार्यक्रम

**सोलापूर** : सोलापूरचे थोर सुपुत्र आंतरराष्ट्रीय मानवतावादी डॉक्टर द्वारकानाथ कोटणीस यांच्या ८० व्या स्मृतिदिनानिमित्त मानवतावादी सप्ताह अंतर्गत रोटरी क्लब ऑफ जुळे सोलापूर व डॉक्टर द्वारकानाथ कोटणीस स्मृती समिती यांच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती डॉ. सुरेश व्यवहारे यांनी पत्रकार परिषदेत दिली. स्मृतिदिनी ९ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत चार हुतात्मा पुतळा चौक येथून वैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थी, कर्मचारी यांची रॅली काढण्यात येणार आहे. परिवर्तन अकादमी सोलापूरने तयार केलेला डॉक्टर कोटणीस यांच्या जीवन कार्यावरील माहितीपट दि ब्लॅक मदर हा विद्यार्थ्यांना दाखविण्यात येणार आहे. ४ रोजी डॉक्टर कोटणीस स्मारक येथे तर ११ डिसेंबर रोजी नई जिंदगी आणि १८ डिसेंबर रोजी बुधवार पेठ येथे सर्व रोग निदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे, असे व्यवहारे यांनी सांगितले. पत्रकार परिषदेत डॉ. नितीन प्रभुणे, डॉ. अमित गायकवाड, डॉ. शुभदा खंदारे, डॉ.नयना व्यवहारे, डॉ. कीर्ती गोळवलकर, डॉ. सारिका होमकर ,डॉ. सोहेल मुजावर, डॉ. शलाका गायकवाड,डॉ. विजयकुमार संगोळगी आदी उपस्थित होते.



# शहर-जिल्ह्यात दोन दिवस मतदार नाव नोंदणी विशेष मोहीम

**सोलापूर** : भारत निवडणूक आयोगाने १ जानेवारी २०२३ या अर्हता दिनांकावर अधारित छायाचित्रासह मतदार यादी विशेष संक्षिप्त पुनर्निरीक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. त्या अनुषंगाने शहर व जिल्हयातील सर्व मतदान केंद्रांवर उद्या शनिवारी व रविवारी दोन दिवस विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे.



यात नवीन नाव नोंदणी, दुरूस्ती, व हरकती नोंदविता येणार असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी मिलिंद शंभरकर यांनी सांगितले. या विशेष मोहिमेमध्ये अस्तित्वात असलेली मतदारयादी सर्व नागरिकांना पाहण्यासाठी व तपासण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येणार असून नागरिकांनी मतदार यादीमध्ये नोंदी तपासून घ्याव्यात. मतदार यादीमध्ये नोंदणी झालेल्या मतदारांच्या नोंदणीचे प्रमाणीकरण करण्याची कार्यवाही सुरू असल्याने मतदारांनी त्यांचा आधार क्रमांक मतदार ओळखपत्राशी संलग्न करण्यासाठी त्यांचे आधार क्रमांक संबंधित बीएलओ यांच्याकडे द्यावेत.

मतदार यादीमधील नोंदणीबाबत हरकती, नोंदीमध्ये दुरुस्ती व नवीन नाव नोंदणी करावयाची सुविधा मोहिमेमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या मोहिमेमध्ये मृत मतदार, कायम स्थलांतरीत मतदार व लग्न होवून बाहेर गेलेल्या महिला मतदार नावाची वगळणी तसेच लग्न होवून आलेल्या महिलांच्या नावांची नोंदणी, दिव्यांग मतदार चिन्हांकित करणे त्याचबरोबर १ जानेवारी २०२३ रोजी १८ वर्ष पूर्ण होत असलेल्यांची नवीन मतदार म्हणून नोंदणी करणे, ज्यांचे १ ऑक्टोबर २०२३ पर्यंत १८ पूर्ण होणार आहेत. त्यांच्याकडून नवीन मतदार नोंदणीसाठी आगाऊ अर्ज भरून घेण्यात येणार आहेत.

नागरिकांनी या विशेष मोहिमेमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवावा, असे आवाहन उपजिल्हा निवडणूक अधिकारी भारत वाघमारे यांनी केले आहे.

# अन्न व परवाना विभागाकडून ६ हजार ६१८ व्यावसायिकांना परवानगी

**सुराज्य/सोलापूर**

सोलापूर महापालिकेच्या अन्न व परवाना विभागांतर्गत शहरातील एकूण ६ हजार ६१८ व्यवसायिकांनी विविध प्रकारच्या व्यवसायाकरिता परवानगी घेतली आहे. दरम्यान, ऑक्टोबर २०२२ अखेर एकूण ५ लाख ६२ हजार ५९९ रुपये परवाना शुल्कपोटी रक्कम जमा झाली आहे.



महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ च्या कलम ३७६, ३८१ अंतर्गत विविध प्रकारच्या परवाना पात्र व्यवसायांना परवाने व ना हरकत प्रमाणपत्र महापालिकेच्या अन्न व परवाना विभागाच्या वतीने दिले जाते. महापालिकेच्या या विभागांतर्गत विविध प्रकारचे १५६ व्यवसाय आहेत. या व्यवसायिकांना महापालिकेकडे परवाना व ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. सोलापूर शहरांमध्ये सद्यस्थितीत एकूण ६ हजार ६१८ व्यवसायिकांनी विविध प्रकारच्या व्यवसायासाठी परवानगी घेतली आहे. साधारणतः १६० रुपयापासून ते २ हजार ५३० रुपयांपर्यंत विविध प्रकारच्या व्यवसायांना परवाना शुल्क आकारणी केली जाते. महापालिका आयुक्तांच्या आदेशानुसार व उपायुक्त यांच्या मार्गदर्शनाखालीचालू आर्थिक वर्षी या विभागाला दहा लाखाचा इष्टांक दिला होता. या विभागांतर्गत विविध प्रकारच्या व्यवसायांना परवाने व ना हरकत प्रमाणपत्र दिले जाते. एकूण ६ हजार ६१८ व्यवसायिकांनी विविध प्रकारच्या व्यवसायासाठी परवानगीघेतली. ऑक्टोबर २०२२ अखेर ५ लाख ६२ हजार ५९९ रुपये परवाना शुल्क जमा झाले आहे.

## ऑक्टोबरअखेरपर्यंत ५.६२ लाख परवाना शुल्क जमा

**विनापरवाना व्यवसाय करणाऱ्यांवर होणार कारवाई**

ज्या व्यवसायिकांनी आपल्या व्यवसायाचे परवाने नूतनीकरण महापालिकेच्या या विभागाकडे केले नसतील अथवा परवाना न घेता विनापरवाना व्यवसाय करत असतील त्यांनी तत्काळ विहित शुल्क भरून परवाना नूतनीकरण करून घ्यावा अन्यथा संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही या विभागाने दिला आहे.

**परवाना व नूतनीकरण ऑनलाईन सेवा उपलब्ध : कुलकर्णी**

महापालिका अन्न व परवाना विभाग अंतर्गत ऑनलाईन करण्यात आला आहे. व्यवसाय परवाना नूतनीकरण, नवा परवाना मागणी, ना हरकत परवाना, नाव बदल आदी सुविधा ऑनलाईन उपलब्ध आहेत. नागरिकांनी व व्यवसायिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. अन्नसुरक्षा व मानदे कायद्यांर्गत खाद्यपदार्थ विषयक उत्पादन व विक्री हे व्यवसाय महाराष्ट्र शासनाच्या सहाय्यक आयुक्त अन्न व औषध सोलापूर कार्यालयाकडे वर्ग करण्यात आले आहेत. त्यामुळे महापालिकेकडे खाद्यपदार्थ, उत्पादन, पेय व्यवसायांना परवाने दिले जात नाहीत, असे अन्न व परवाना विभागाचे अधीक्षक अधीक्षक एस. एस. कुलकर्णी यांनी स्पष्ट केले.

## वाहन अडवून लाथाबुक्यांनी मारहाण

**सोलापूर** : वाहन अडवून एकास लाथाबुक्क्यांनी मारहाण करीत जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ३० नोव्हेंबर रोजी दुपारी तीन वाजण्याच्या दरम्यान हेरिटेज मंगल कार्यालय जवळ घडली.याप्रकरणी बिरप्पा अर्जुन पुजारी (वय-३८, रा. मुळ टाकळी, ता.द.सोलापूर, सध्या- इंडी जिल्हा विजापूर) यांनी सदर बाजार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून देविदास राजाराम मेटकरी (रा. गणेश नगर,बाळे) व अविनाश दिलीप हमरे (रा.आसरा चौक, जुळे सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

## रोख रकमेसह दागिने पळविले

**सोलापूर** : अज्ञात चोरट्याने हॉलच्या दरवाजाचा कडी-कोंयडा तोडून घरात प्रवेश केला.त्यानंतर बेडरूम मधील लाकडी कपाटाचे लॉक तोडून कपाटामध्ये ठेवलेली रोख रक्कम,सोन्याची अंगठी, सोन्याचे कर्णफुले व सोन्याची गळशेरी असा एकूण ६० हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला आहे.ह ी घटना दि.२१ नोव्हेंबर ते १ डिसेंबर दरम्यान अरुण उदयनगर शांती रोड नई जिंदगी येथे घडली. याप्रकरणी सादिक म.युसुफ सय्यद (वय-५१,रा.अरुण उदयनगर शांती रोड,नई जिंदगी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल पाटील हे करीत आहेत.

## नेहरूनगर येथे शाळेसमोरून दुचाकी लंपास

**सोलापूर** : नेहरूनगर येथील जिल्हा परिषद शाळेसमोर पार्क करून ठेवलेले दुचाकी क्रमांक एम.एच.१३.डीबी.१९१५ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना दि.२७ ऑक्टोंबर रोजी घडली. याप्रकरणी विकास मदन हुबळीकर (वय-२५,रा. होटगी स्टेशन तालुका दक्षिण सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक गायकवाड हे करीत आहेत.

## पैशाच्या कारणावरून तरुणास मारहाण

**सोलापूर** : पैशाच्या कारणावरून तरुणास शिवीगाळ करत खोऱ्याने मारहाण केल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना दि.३० नोव्हेंबर रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास अंबिका नगर बाळे येथे घडली. याप्रकरणी गोपाळ सुरवसे (वय-२८,रा. अंबिका नगर बार्शी रोड बाळे) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून आकाश भवर (रा.अंबिकानगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस नाईक कसबे हे करीत आहेत.